रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १९३
www.ramprahar.com
मंगळवार, ३० जानेवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

रायगड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन/२
श्रीवर्धनमध्ये वाहतूक कोंडी; उपाययोजनेची मागणी/५
दुसऱ्या कसोटीसाठी सरफराज, सुंदरला संधी/८

## काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकरांविरुद्ध गुन्हा दाखल



**पुणे :** महापालिकेच्या अधिकाऱ्याला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करणे आमदार रवींद्र धंगेकर यांना भोवले आहे. महापालिकेच्या अभियंता संघाच्या निषेधानंतर सोमवारी (दि.२९) रात्री धंगेकर यांच्याविरुद्ध चतुःशृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यावरून आमदार धंगेकर यांच्याविरुद्ध कलम ३५३ नुसार सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. एका कार्यक्रमास काँग्रेस पक्षाला डावलल्याचा आरोप करून आमदार धंगेकर यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत धमकावले होते. धंगेकर यांच्यावर यापूर्वी नगरसेवक असताना महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांवर चप्पल फेकल्याने गुन्हा दाखल झाला होता.


# कुठल्याही प्रकारचे आव्हान स्वीकारण्यासाठी तयार व्हा!

## ‘परीक्षा पे चर्चा’मध्ये पंतप्रधान मोदींकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि.२९) देशभरातील विद्यार्थ्यांना परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात मार्गदर्शन करून परीक्षेसंबंधी उपयुक्त टीप्स दिल्या. परीक्षा देण्याचा क्षण हा प्रत्येकाच्याच आयुष्यात येत असतो, असे सांगून कुठल्याही प्रकारचे आव्हान स्वीकारण्यासाठी तयार व्हा, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. या वेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, हळूहळू अभ्यासावर लक्ष केंद्रित करा. तुम्ही त्याचा ताण घेऊन नका. अनेकदा मुले परीक्षेचा ताण घेतात. त्याचे महत्त्वाचे कारण असते ते पालक दोन विद्यार्थ्यांमध्ये तुलना करतात. त्याला इतके चांगले मार्क मिळाले, तुला नाही असे म्हणतात. हे असे करणे पालकांनी टाळले पाहिजे, कारण त्यामुळे मुलांवरचा अभ्यासाचा ताण वाढतो. मी पालकांना आणि शिक्षकांना हे सांगू इच्छितो की,



### लिहिणे खूप आवश्यक

*आपल्या मार्गदर्शनात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले की, सध्या संगणक आणि मोबाईलचा काळ आहे. या काळात आपण लिहिणे विसरत चाललो आहोत. फक्त परीक्षेचीच उत्तरे नाही, तर त्याआधीही लिखाणाची सवय ठेवा. लिहून पाहिल्याने समजते की आपल्याला किती गोष्टी खरोखर आत्मसात करता आल्या आहेत तसेच तुम्ही जे लिहिता ते तुमच्या लक्षात राहते.*

तुम्ही तुलना करू नका. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात द्वेष भावना किंवा तिरस्कार निर्माण होऊ शकतो.

विद्यार्थ्यांनीही परीक्षेचा फार विचार न करता योग्य पद्धतीने तयारी केली पाहिजे. एखाद्याला १०० पैकी ९० गुण मिळत असतील तर हे लक्षात घ्या की, आपण मेहनत जास्त केली पाहिजे किंवा गुण वाढवण्यावर लक्ष केंद्रित करायला हवे. स्पर्धा स्वतःशी करा. ज्या अडचणी येतात त्याबद्दल आई-वडील आणि शिक्षकांशी बोलले पाहिजे, असे सांगून पंतप्रधान मोदींनी म्हटले की, हुशार मुलांचा द्वेष, तिरस्कार करू नका, त्यांच्याशी स्पर्धा करू नका. उलट त्यांच्याशी मैत्री करा. त्यांच्याकडून ते अभ्यास कसा करतात ते जाणून घ्या. जो गणितात हुशार आहे त्याच्याकडून गणित शिका, ज्याची भाषा चांगली आहे त्याच्याकडून भाषा शिका. अभ्यास आणि शाळा, महाविद्यालय हे सगळे काही काळासाठी असते, मात्र मैत्री ही कायमची होत असते हे लक्षात असू द्या.

# ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात अध्यादेश काढून मागण्या मान्य केल्या. यानंतर ओबीसी समाजाकडून तीव्र विरोध सुरू झाला आहे. यावर महायुतीतील महत्त्वाच्या नेत्यांकडून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. अशातच उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही, असे स्पष्ट केले आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आमचे सरकार कुठल्याही परिस्थितीत ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीदेखील तीच भूमिका आहे. आम्हाला ओबीसीचे आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करावेच लागेल. मुख्यमंत्र्यांचेही तेच म्हणणे आहे.

मी राज्याला स्पष्टपणे सांगतो की, भारतीय जनता पक्ष या सरकारमध्ये आहे तोवर काहीही झाले तरी



आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. उद्या अशी वेळ आली की, आम्हाला ओबीसींना संरक्षण देता येत नाहीये, तर मी स्वतः माझ्या वरिष्ठांशी बोलेन. काहीही झाले तरी ओबीसींवर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाईल आणि हीच भाजपची भूमिका आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व मंत्री छगन भुजबळांच्या आक्रमक भूमिकेबाबत विचारल्यावर उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, माझे त्यांना एवढेच सांगणे आहे, त्यांनी संयम ठेवावा. मी लवकरच त्यांच्याशी चर्चा करणार आहे. कुठेही ओबीसींवर अन्याय होत असेल, तर आपण त्यात परिवर्तन करू. आवश्यकता असेल तिथे सुधारणा करू, परंतु ओबीसींवर अन्याय होऊ देणार आहे.

मराठा आरक्षणाबाबत उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आमचे मत स्पष्ट आहे, आता जो काही निर्णय घेतला आहे, तो कुठलाही सरसकट निर्णय नाही. ज्यांच्या कुणबी नोंदी आहेत, त्यांना प्रमाणपत्र सहज कसे मिळेल एवढाच तो निर्णय आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांवर जे काही दाखवले जातेय, जी संख्या माध्यमांवर दाखवली जात आहे त्यावर ओबीसी आणि मराठा दोन्ही बाजूने प्रतिक्रिया थांबायला हव्यात.

### सरकारची भूमिका संतुलित

मराठा आणि ओबीसी संघर्षाबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दोन्ही समाजांबाबत सरकारची भूमिका संतुलित आहे. आम्ही मराठा आरक्षणासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. कायदेशीर प्रक्रिया करून मराठा समाजाला आरक्षण द्यायचे आहे. त्यासाठी राज्य मागासवर्ग आयोग पूर्ण कार्यवाही करीत आहे. त्याचबरोबर आम्ही ओबीसींवर अन्याय होऊ देणार नाही. मला वाटते अशा परिस्थितीत सर्वांनीच संयम बाळगला पाहिजे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाज दर्पण पुरस्काराने सन्मान



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण दर्पण वर्तमानपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैद्यकीय, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत अविरतपणे उल्लेखनीय कार्य करणारे आणि सर्व समाजाला प्रेरणादायी व्यक्तिमत्व असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना राज्यस्तरीय समाज दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी मुंबईतील नेरूळ येथील आगरी कोळी सांस्कृतिक भवनात रविवारी (दि.२८) झालेल्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार बाळाराम पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रदीप तिदार, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जी.के.डोंगरगावकर, ज्येष्ठ पत्रकार विश्वरथ नायर, जी.डी. गोवारी कॉलेजचे चेअरमन सूरदास गोवारी, ‘कोकण दर्पण’चे संपादक संजय महाडिक, निवेदक मुकेश शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. **(पान २ वर..)**

## निवडक

### सिमी संघटनेवर पुन्हा बंदी; गृहमंत्रालयाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** स्टुंडट्स इस्लामिक मूव्हमेंट ऑफ इंडिया (सिमी) या संघटनेवर आणखी पाच वर्षांसाठी बंदी घालण्याचा निर्णय केंद्रीय गृहमंत्रालयाने घेतला आहे. गृहमंत्रालयाच्या सोशल मीडिया खात्यावरून ही माहिती देण्यात आली. भारताचे सार्वभौमत्व, सुरक्षा आणि अखंडता धोक्यात आणण्यासाठी, दहशतवादाला खतपाणी घालण्यात, शांतता आणि जातीय सलोखा बिघडवण्यात सिमीचा सहभाग असल्याचे आढळून आल्याने ही बंदी वाढवण्यात आली आहे.

### लालू प्रसाद यादव यांची ईडीकडून कसून चौकशी

**पाटणा :** जमिनीच्या बदल्यात नोकरी प्रकरणात राष्ट्रीय जनता दलाचे लालू प्रसाद यादव यांची सोमवारी (दि. २९) ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालयाने आपल्या पाटणा येथील कार्यालयात नऊ तास चौकशी केली. त्यामुळे लालू आता पुन्हा एकदा अडचणीत आले आहेत.

# हरित हायड्रोजन निर्मितीसाठी सात कंपन्यांसमवेत सामंजस्य करार

## महाराष्ट्रात दोन लाख ७६ हजार ३०० कोटींची गुंतवणूक अन् ६४ हजार रोजगारांची निर्मिती होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

हरित हायड्रोजन काळाची गरज असून त्यासाठी महाराष्ट्रात दोन लाख ७६ हजार ३०० कोटी रुपये एवढी आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या सात प्रकल्पांसाठी विविध कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. या माध्यमातून ६४ हजार रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्य शासन आणि हायड्रोजन उर्जा निर्मिती करणाऱ्या विकासकांमध्ये सामंजस्य करार करण्यात आले. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे आणि कंपन्यांचे प्रतिनिधी या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील हरित हायड्रोजनवर



फोकस केला आहे. केंद्र सरकारच्या हरित हायड्रोजन मिशनच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य शासनाने हरित हायड्रोजन धोरण २०२३ प्रकाशित केले आहे. त्याद्वारे २०३०पर्यंत ५०० केटीपीए इतके हरित हायड्रोजन निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी राज्य शासनातर्फे हरित हायड्रोजन विकासकांना विविध अनुदान सवलती देऊ केलेल्या आहेत.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हरित हायड्रोजनसंदर्भात प्रभावशाली धोरण करणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३०पर्यंत डीकार्बनाईज करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार वाटचाल सुरू असून हरित हायड्रोजन असे तंत्रज्ञान आहे की पर्यावरणाचा समतोल राखून ऊर्जा निर्मिती करणे शक्य होणार आहे.

# राज्यसभा निवडणुकीचे बिगूल वाजले

## महाराष्ट्रासह १५ राज्यांत २७ फेब्रुवारीला मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



देशात लोकसभा निवडणुकीचे वेध लागले असताना केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्यसभेच्या महाराष्ट्रासह १५ राज्यांतील ५६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार २७ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी ८ फेब्रुवारी रोजी अधिसूचना जाहीर होणार आहे. १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करता येईल. १६ फेब्रुवारीला उमेदवारांच्या अर्जांची छाननी प्रक्रिया होईल. २० फेब्रुवारीपर्यंत उमेदवार आपला अर्ज मागे घेऊ शकतील. २७ फेब्रुवारीला सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया आणि त्याच दिवशी मतमोजणी होईल.

संसदेचे वरिष्ठ सभागृह असलेली राज्यसभा हे स्थायी सभागृह असून ते कधीही विसर्जित होत नाही, मात्र या सभागृहाचे एक-तृतियांश सदस्य दर दोन वर्षांनी निवृत्त होतात. मूळ राज्यघटनेने राज्यसभा सदस्यांचा कालवधी निश्चित केलेला नाही. ती जबाबदारी संसदेकडे देण्यात आली. त्यानुसार संसदेने लोकप्रतिनिधी कायदा १९५१ पारित करीत राज्यसभेच्या सदस्यत्वाची मुदत सहा वर्षे निश्चित केली आहे.

राज्यसभेला वरिष्ठ सभागृह असेही संबोधले जाते. राज्यसभेत जास्तीत जास्त २५० जागा असू शकतात. त्यापैकी १२ सदस्य राष्ट्रपतींकडून निवडले जातात, तर उर्वरित २३६ सदस्य देशातील सर्व राज्यांतून आणि दोन सदस्य केंद्रशासित प्रदेशातून निवडले जातात.

### या राज्यांमध्ये ‘मत’संग्राम

*१३ राज्यातील जागांचा कार्यकाळ २ एप्रिल रोजी संपणार आहे, तर उर्वरित दोन जागांचा कार्यकाळ ३ एप्रिल रोजी संपणार आहे. उत्तर प्रदेश १०, महाराष्ट्र व बिहार प्रत्येकी सहा, मध्य प्रदेश व पश्चिम बंगाल प्रत्येकी पाच, गुजरात व कर्नाटक प्रत्येकी चार, राजस्थान, आंध्र प्रदेश, तेलंगणा, ओडिशा प्रत्येकी तीन, तर छत्तीसगड, हरयाणा, हिमाचल प्रदेश व उत्तराखंडमध्ये प्रत्येकी एक अशा एकूण ५६ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली आहे.*

# राष्ट्रवादी आमदार अपात्रताप्रकरणी लवकरच निकाल

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल दिल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस प्रकरणात काय निर्णय देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाचा निकाल १५ फेब्रुवारीपर्यंत द्या, असे निर्देश नार्वेकरांना दिले आहेत. याबाबत नार्वेकरांनी सोमवारी (दि.२९) महत्वाची माहिती दिली.



विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकरांची माहिती

माध्यमांशी संवाद साधताना नार्वेकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या याचिकेसंदर्भात आजची सुनावणी पूर्ण झाली असून आम्ही आजच आम्ही दोन्ही बाजुचा एव्हिडेन्स क्लोज केलेला आहे. उद्या आणि परवा यावर अंतिम सुनावणी होईल आणि ३१ तारखेला हे प्रकरण क्लोज होईल. मला खात्री आहे १५ फेब्रुवारीच्या आत अंतिम निर्णय जारी केला जाईल.

देशाच्या पक्षांतर बंदी कायदा समितीच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकरांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यावरून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सवाल उपस्थित केला आहे. याबाबत

### पक्षांतरबंदी कायदा चिकित्सा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार अपात्रतेच्या प्रकरणामध्ये ज्या दहाव्या परिशिष्ठाचा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी वारंवार आधार घेतला, त्या परिशिष्ठाची चिकित्सा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीच्या अध्यक्षपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी महाराष्ट्र विधानभवनात झालेल्या ८४व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी आणि सचिव परिषदेत याबाबतची घोषणा केली.

बोलताना नार्वेकर म्हणाले की, अशा मोठ्या पदावर राज्यातील एखादा व्यक्तीची निवड झाल्यावर, राज्यासाठी हा मोठा क्षण असतो, पण उद्धव ठाकरेंचा राज्याची अस्मिता आणि राज्यातील बांधवाबद्दल प्रेम व्यक्त करण्याचा वेगळा अंदाज असेल. त्यामुळे मी त्यांच्या शुभेच्छांसाठी त्यांना धन्यवाद करतो. त्यांचे माझ्यावर विशेष प्रेम आहे, असा टोलाही नार्वेकरांनी लगावला.

# मुंबई पोलिसांचे ११ ठिकाणी छापे

## २२ लाखांचे ड्रग्ज जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांच्या अमली पदार्थविरोधी पथकाने ड्रग्स प्रकरणात एकाचवेळी ११ ठिकाणी छापे टाकत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत जवळपास दोन कोटी २२ लाखांचे ड्रग्स जप्त करण्यात आले आहेत. या धडक कारवाईमुळे ड्रग्ज माफियांचे धाबे दणाणले आहेत.

मुंबईतील ग्रँड रोड, माजगाव, नागपाडा, आगरी पाडा, सांताक्रुज पूर्व, कॉटन ग्रीन या विभागात एकूण ११ ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईत एकूण एक किलो ११० ग्रॅम वजनाचे एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले आहेत तसेच एकूण ११ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# महिलांनी महिलांना मदत करून प्रोत्साहित करावे -डॉ. शुभा पाध्ये

## नवीन पनवेल येथील मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांनी महिलांना मदत करून प्रोत्साहित करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भाजपच्या बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाच्या महाराष्ट्र प्रदेश संयोजिका डॉ. शुभा पाध्ये यांनी नवीन पनवेल येथे मेळाव्यादरम्यान केले. हा मेळावा भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २८) उत्साहात झाला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या माध्यमातून महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांची महिलांना माहिती व्हावी आणि त्यांचा लाभ त्यांनी घ्यावा या



दृष्टिकोनातून नवीन पनवेल सेक्टर २ येथील मैदानात बेटी बचाव बेटी पढाओ अभियान अंतर्गत १० विविध योजनांचा माहिती मेळावा तसेच समृद्धी सुकन्या योजनेंतर्गत १० नवीन खाते उघडणे आणि गरजू मुलींना सॅनेटरी पॅड वाटप उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानाच्या प्रदेश सहप्रभारी आरती तायडे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष राजश्री वावेकर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, संतोष शेट्टी, माजी नगरसेविका नीता माळी, प्रभाग अध्यक्ष शिवाजी भगत, एस.तिवारी, मयुरेश खिस्मतराव यांच्यासह महिला मोर्चाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्या महिला उपस्थित होत्या.

# निप्पॉन स्टीलसोबत सामंजस्य करार

## ■ राज्यात ४० हजार कोटींची गुंतवणूक; २० हजार रोजगार निर्मिती होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

औद्योगिक गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र जगभरातील उद्योजकांचे पसंतीचे राज्य ठरत असून दावोसमधील सामंजस्य करारानंतर सोमवारी (दि. २९) महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी राज्यात सहा एमटीपीए क्षमतेचा एकात्मिक पोलाद प्रकल्प उभारण्याकरिता अर्सेलर मित्तल निप्पोन स्टील इंडिया कंपनीसोबत ४० हजार कोटी गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. यामुळे २० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.




सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, निप्पॉन स्टीलचे उपसंचालक कुबोटा सॅन, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित हरलका आदी उपस्थित होते.

दावोस येथे नुकतेच प्रसिद्ध उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली होती. त्या वेळी एका प्रकल्पावर समाधान न ठेवता एकापेक्षा अधिक प्रकल्पांसाठी गुंतवणूक करण्यात यावी, अशी मुख्यमंत्र्यांनी मित्तल यांच्याकडे इच्छा व्यक्त केली होती.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यातील लोह खाणींना जोडणारा हा प्रकल्प राज्याच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान देणारा आहे. महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण असून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नुकत्याच दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्यात सुमारे तीन लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात असलेल्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ यामुळे औद्योगिक विकास वेगाने होत आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र देशात अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज झालेला सामंजस्य करार हा अविस्मरणीय क्षण आहे. राज्यात आम्ही आपले स्वागत करतो. राज्यात असलेल्या पोषक वातावरणामुळे गुंतवणूक वाढत असून महाराष्ट्रात सध्या अतिविशाल पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. देशात सुरू असलेल्या मोठ्या पायाभूत प्रकल्पांपैकी सुमारे ३५ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले. ४० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा हा प्रकल्प असून त्याद्वारे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष २० हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

# पतीचा पत्नीला जीवे मारण्याचा प्रयत्न

## कर्जतमधील घटना; आरोपी ताब्यात

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यात राहणाऱ्या वेगवेगळ्या समाजाच्या दोन व्यक्तींनी वीस वर्षांपूर्वी विवाह केला होता, मात्र त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या कारणावरून वाद होत असे याला कंटाळून मुलीने घटस्फोटाचा निर्णय घेतला या प्रकरणाबाबत न्यायालयात दावा दाखल केला होता याचा राग मनात ठेवून नवऱ्याने रविवारी (दि.२८) सायंकाळी सातच्या सुमारास पत्नीच्या डोक्यात लोखंडी हत्यारांने वार करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला या प्रकरणी कर्जत पोलिसांनी पतीला ताब्यात घेतले आहे.

मूळचा कर्जत तालुक्यात राहणारा शेखर रामचंद्र रोकडे (वय ४४) आणि कर्जत शहरात राहणारी सैनी हीचा वीस वर्षांपूर्वी विवाह झालाहोता मात्र कोणत्या ना कोणत्या कारणामुळे त्यांच्यात वाद होत असे याला कंटाळून त्याची पत्नी कविता शेखर रोकडे (वय ३५) हिने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला त्याप्रमाणे न्यायालयात दावा दाखल केला व ती कर्जत शहरातील मुद्रे नाना मास्तर नगर येथे साई सावली अपार्टमेंटमध्ये राहू लागली तर तिचा पती शेखर रोकडे दिपाली पार्क, शाश्वत पार्क बदलापूर ठाणे येथे राहावयास गेला पत्नीने घटस्फोटासाठी न्यायालयात दावा दाखल केला याचा राग मनात ठेवून तिला ठार मारण्याचा बेत बनवला त्यानुसार पत्नी कविता रोकडे मुद्रे नानामास्तर नगर येथून आपल्या स्कुटीने आपले वडील पुरुषोत्तम सैनि राहत असलेल्या नेमिनाथ येथे येत असताना मुद्रे गावचे हद्दीत फायरब्रिगेड ऑफिस समोर आली त्यावेळी तीला कोणचा तरी फोन आल्याने तीने स्कूटी रस्त्याचे बाजुला लावुन फोनवर बोलत असतांना त्या ठिकाणी पती शेखर रोकडे दबा धरून बसला होता भांडणाचा राग मनात धरून लोखंडी हत्याराने त्याने पत्नी कविता हिच्या डोक्याचे पाठीमागे वार करून गंभीर दुखापत करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

या रस्त्यावर नेहमीच रहदारी असल्याने ही बातमी वाऱ्यासारखी पसरली याची दखल घेताच कर्जत पोलीस घटनास्थळी त्वरित पोहोचले व जखमी अवस्थेत रस्त्यावर पडलेली कविता रोकडे ला त्वरित कर्जतच्या उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले मात्र डोक्यात जबर जखम असल्याने तिला पुढील उपचारासाठी पुढे पाठवण्यात आले, जखमी कविताला वाशी येथील फोर्टिज हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

# रायगड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या वतीने ५१ वा रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन २०२३-२४' आयोजीत करण्यात आला आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित तांबे यांच्याहस्ते उद्घाटन झाले. हा कार्यक्रम सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाहक गिता पालरेचा यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

कळंबोलीतील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात २९ ते ३१ जानेवारी दरम्यान रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा समारोप आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम बुधवारी प्रमुख मान्यवराच्या उपस्थित होणार आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी प्रकल्प संचालक रायगड जिल्हा परिषद प्रियदर्शनी मोरे मॅडम, शिक्षणाधिकारी माध्यमिक रायगड जिल्हा परिषद ज्योत्सना शिंदे पवार मॅडम, सर गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पनवेल सिताराम मोहिते, गटविकास अधिकारी नवनाथ साबळे, अधिकारी माध्यम विभाग रायगड जिल्हा परिषद सुभाष शिंदे, सचिव सुधागड एज्युकेशन सोसायटी रविकांत घोसालकर, राजेंद्र पालवे, पंकज भगत, अनिल पाटील यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ट्रकच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातून जाणाऱ्या मुरबाड राष्ट्रीय महामार्ग रस्त्याने खालापूर येथील दुचाकी चालक कडाव येथे जात होता. त्यावेळी भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिली आणि या अपघातात दुचाकी चालक ठार झाला. खालापूर तालुक्यातील कांढरोली येथील धनंजय नरेश ठाकूर (वय २०) हा तरुण मित्र विशाल सीताराम वाघमारे यांच्यासोबत कर्जत मुरबाड रस्त्याने कडावकडे जात होता.

कडाव येथील मुन्नालाल हा ट्रक घेवून कर्जत बाजुकडून मुरबाड बाजुकडे घेवून जात होता. दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास कर्जत एच पी पेट्रोल पंप येथे ट्रकने पाठीमागुन जोरात ठोकर दिली आणि या अपघातात स्कुटी चालक आणि स्कुटीवर पाठीमागे बसलेला त्याचा मित्र विशाल वाघमारे हे दोघे स्कुटीसह रस्त्यावर पडले. त्यावेळी अपघातग्रस्त ट्रकच्या पाठीमागील चाक स्कूटीचालक धनंजय ठाकूर याचा तेथे जागीच मृत्यू झाला.

या घटनेतील जखमी तरुण विशाल वाघमारे यास कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. ट्रकचालक मुन्ना लाल यास पोलिसांनी अटक केली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार वडते करीत आहेत.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ.), कोंकण भवन, नवी मुंबई**

दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५७१५३४ e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in

**निविदा सुचना क्र. १७ सन २०२३ २०२४**
**ई-निविदा सूचना**

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोंकण भवन, नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून (कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे ( ऑन लाईन ) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १ | मारळ, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे धुप प्रतिबंधक बंधारा बांधणे (भाग-३) | रु. २,८९,६२,५४३/- |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.२९/०१/२०२४ स. ११.३० ते १३/०२/२०२४ दु. १४.०० पर्यंत
निविदा पुर्व बैठक - :- दि ०५/०२/२०२४ दु.१५.०० वा. मा. मुख्य अभियंता, (सा. बां) प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, ४ था मजला, फोर्ट, मुंबई, ४००००१ येथे आयोजित करण्यात आलेली आहे.
निविदा उघडण्याचा कालावधी :- दि. १४/०२/२०२४ दु.१५.०५ वा.

टिप - ई-निविदेची संपूर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
1. https://mahapwd.gov.in 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र. पअउ / निविदा /१०४
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक : १८/०१/२०२४

सही/-
**(बी. बी. ननवरे)**
पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई


# सीकेटी कॉलेजमध्ये तीन दिवसीय कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे समुपदेशन कक्ष विभागातर्फे लाईफस्किल मास्टरी : ब्लूप्रिंट टू सक्सेस (Lifeskills Mastery: Blueprint To Success) या तीन दिवसीय कार्यशाळेचे २४, २५ आणि २७ जानेवारी, २०२४ रोजी आयोजन करण्यात आले होते. अ‍ॅड. धनश्री कदम, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख डॉ.बी.डी. आघाव आदींनी या कार्यशाळेच्या उद्घाटनावेळी उपस्थिती लावली.



कार्यशाळा फक्त प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या मुलींसाठी आयोजित करण्यात आली होती तसेच ही कार्यशाळा विद्यार्थिनींचा सामाजिक क्षमतांचा विकास होण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आली होती. २४ फेब्रुवारी रोजी अ‍ॅड. धनश्री कदम यांनी लैंगिक छळ प्रतिबंध (POSH) कायदा २०२३ या विषयाबाबत मार्गदर्शन केले. तसेच २५ फेब्रुवारी रोजी खांदेश्वर पोलीस स्टेशन मधील सायबर क्राईम विभागाचे सुदर्शन सारंग यांनी सायबर क्राईम गुन्ह्यांबाबत विशेष मार्गदर्शन केले.

२७ फेब्रुवारी रोजी वात्सल्य क्लिनिकच्या संस्थापिका, स्त्रीरोगतज्ञ डॉ. क्रांती फडणीस यांनी मासिक पाळी व त्या दरम्यान होणारे त्रास, योग्य पद्धतीचा आहार या विषयांवर शास्त्रशुद्ध माहिती दिली. तेरणा हॉस्पिटलच्या स्त्रीरोगतज्ञ डॉ. दीपा काला यांनी योग आणि आरोग्य, वाढते वय, ताण-तणाव व्यवस्थापन इत्यादी या विषयांवर प्रात्याक्षिके घेऊन सहभागी विद्यार्थीनिंना मार्गदर्शन केले. सर्व सत्रांमध्ये उत्तम प्रकारे मार्गदर्शन मिळाल्याने, सहभागी मुलींनीही उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन आपल्या प्रश्नांचे निरसन करून घेतले.

समुपदेशन कक्ष विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने विशेष प्रयत्न घेतले.

पान १ वरुन

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाज दर्पण पुरस्काराने सन्मान

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना समाज दर्पण पुरस्कार, कामगार नेते महेंद्र घरत यांना भूमिपुत्ररत्न पुरस्कार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांची महाराष्ट्रासह देशात ओळख आहे. त्यांच्या मुशीतून अनेक समाजसेवक घडले आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कधीही जातीचे किंवा पक्षाचे राजकारण केले नाही. मदत मागण्यासाठी जो त्यांच्याकडे आला त्याला मदत करणे हा त्यांचा आत्मा आहे. त्यामुळेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सन्मान संपूर्ण देशभरात झाला आहे. त्यांचे कार्य हे नेहमीच समाजाला प्रेरणादायी ठरले आहे. त्यांना जीवनात अनेक गौरव आणि पुरस्कार मिळाले आहेत तसेच त्यांची समाजाप्रती असलेली आस्था नेहमीच अधोरेखित झाली आहे. त्या अनुषंगाने राज्यस्तरीय समाज दर्पण पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला.


**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**निविदा सूचना क्रमांक १३६ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोरज देवळे हळदुले रस्ता प्रजिमा १२५ वरील सावित्री नदीवर मोठ्या पुलांचे बांधकाम करणे. ता. पोलादपुर, जि. रायगड | ३,०७,३९,२८६/- | १५५०००/- | २३६०/- | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **२५/०१/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **०८/०२/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | मुख्य अभियंता सा.बां. प्रादेशिक विभाग कोंकण मर्झबान रोड,फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **३०/०१/२०२४ वेळ १२.०० वाजता.** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१२/०२/२०२४** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४१४**
**दिनांक : २५/०१/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**


## दुखवटा

### राजाआप्पा पाटील



**खोपोली :** लव्हेज गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ नेहमीच समाजकार्यात पुढे असणारे सर्वांचे लाडके राजाआप्पा उर्फ राजेश बळीराम पाटील यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली व एक मुलगा आहे. कै. राजाआप्पा पाटील यांचा गावातील सर्व आध्यात्मिक व सामाजिक कार्यात त्यांचा नेहमी सहभाग असायचा.


**महाराष्ट्र शासन**
**परिवहन आयुक्त कार्यालय, ५ वा मजला, टेलिकॉम बिल्डींग नं २,**
**महात्मा गांधी रोड, फाऊंटन, मुंबई ४०० ००१**

दुरध्वनी क्रमांक : ०२२-२०८२७१०३ ई-मेल आयडी : dytcinspect.tpt-mh@gov.in

क्र.पआका/का.१०/रवका/ २० I & C Centre/२०२३/जा.क्र. १२३५ दिनांक: २५/०१/२०२४

**निविदा सूचना**

**विषय -** परिवहन विभागातिल ०८ वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र उभारण्याकरिता निविदा प्रसिध्द केल्याबाबत.
**संदर्भ -** निविदा क्र. TCO/InC/Desk10/2024/ON1200

मोटार वाहन विभागामार्फत अहमदनगर, अकलूज, कराड, नवी मुंबई, पेण, सांगली, सिंधुदुर्ग व वसई या ०८ ठिकाणी वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र उभारण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

परिवहन विभागातिल ०८ वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र उभारण्याकरिता ई-निविदा गव्हर्नमेंट ई-टेंडर (E-Tender) "https:mahatenders.gov.in" या संकेतस्थळावर दि. २५.०१.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर निविदा दाखल करण्याची अंतीम मुदत दि.२०.०२.२०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत आहे.

**स्वाक्षरी/-**
**सहा. परिवहन आयुक्त (निरीक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**



**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**
**निविदा सूचना क्रमांक १४० सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन - ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बोरज उमरठ खोपड ढवळे प्रजिमा १०९ किमी ०/०० ते १५/५०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे. ता. पोलादपुर, जि. रायगड | २,०३,८९,८५३/- | १,५०,००० | १,१८० | १२ महिने | आवश्यकता नाही |
| २ | कोंढवी धामणदेवी महारगुल जननी देवी प्रजिमा ९९ किमी ०/०० ते १५/३०० मध्ये रस्त्याची सुधारणा करणे व संरक्षक भिंत बांधणे. ता. पोलादपुर, जि. रायगड. | २,०१,७०,२३६/- | १,५०,००० | १,१८० | १२ महिने | आवश्यकता नाही |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **३०/०१/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **१३/०२/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **०६/०२/२०२४ वेळ १५.०० वाजता.** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **१५/०२/२०२४** वेळ १२.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४१४**
**दिनांक : २५/०१/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## निवडक

### गाडीसह लॉन्ड्रीच्या कपड्यांची चोरी

**पनवेल :** दुचाकी गाडीसह गाडीवर ठेवलेल्या लॉन्ड्रीच्या कपड्यांचे सहा गाठोडे चोरून नेल्याप्रकरणी दोन अज्ञात चोरट्यांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेमंत गव्हाणकर यांचा सुकापूर येथे लॉन्ड्रीचा व्यवसाय आहे. ते दुचाकी घेऊन लॉन्ड्रीचे कपडे आणण्यासाठी बालाजी सिम्फनी सुकापूर येथे गेले होते. ते बालाजी सिम्पनी येथील गेटजवळील बिकानेर स्वीटच्या बाजूला दुचाकी पार्क करून भुर्जी घेण्यासाठी गेले होते. दरम्यान, ते दुचाकीची चावी काढायला विसरले. याचा फायदा घेत चोरटे हेमंत यांच्या दुचाकीसह त्यावर ठेवलेली कपड्यांची सहा गाठोडी घेऊन पसार झाले. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंद करण्यत आला आहे.

### रोहिदासवाड्यात घरफोडी

**पनवेल :** आईच्या दशक्रिया विधीसाठी कुटुंबासह नाशिक येथे गेले असता बंद घरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून जवळपास दीड लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची घटना पनवेल शहरातील रोहिदासवाडा येथे घडली आहे. संतोष खालापूरकर हे आईच्या दशक्रिया विधीसाठी कुटुंबासह नाशिक येथे गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या घरातील समोरील खिडकीतून आत प्रवेश करून लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून त्यामध्ये असलेले सोन्या-चांदीचे दागिने, लॅपटॉप, व रोख रक्कम असा मिळून जवळपास दीड लाख रुपयांचा ऐवज चोरी केला आहे. याबाबतची तक्रार संबंधितांकडून पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : तळोजा औद्योगिक क्षेत्रातून रात्री होणाऱ्या वायू प्रदूषणाविरोधात मॅरेथॉन झाली. यामध्ये तळोजा, खारघर परिसरातील नागरिकांनी आपला सहभाग नोंदवला.**



# पनवेलमध्येही परीक्षा पे चर्चा कार्यक्रम

## 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील इंग्रजी माध्यमिक विभागामध्ये इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांना परीक्षे पे चर्चा २०२४ या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शाळेतील डीजीटल माध्यमाद्वारे करण्यात आले.

या वेळी परीक्षा पे चर्चा २०२४ हा केवळ परीक्षेचा ताण आणि मानसिक स्थितीशी संबंधित नाही, तर तरुणांना कोणत्या प्रकारच्या संधी मिळतील आणि भविष्यात भारताला विकसित भारत बनवण्यात विद्यार्थी काय योगदान देतील यावरही चर्चा केली.

प्रत्येक नवीन बॅच या समस्यांना तोंड देत आहे. विद्यार्थ्यांच्या बॅचेस बदलत राहतात, पण शिक्षकांच्या बॅच बदलत नाहीत. आत्तापर्यंतच्या एपिसोड्समधील माझे मुद्दे शाळेत वर्णन केले तर विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटू शकतात. कोणत्याही प्रकारचे दडपण सहन करावे, रडता कामा नये, दबाव आयुष्यात निर्माण करत राहतो असे पंतप्रधान मोदीजी म्हणाले.

परीक्षा हॉलमध्ये स्वत:वर विश्वास ठेवा. पंतप्रधान आज परीक्षेतील सर्वांत मोठे आव्हान



लेखन हे आहे, त्यामुळे सरावावर लक्ष केंद्रित करा. परीक्षेपूर्वी, विषय किंवा जे वाचले आहे त्याबद्दल लिहा आणि नंतर स्वत: दुरुस्त करा. कारण पोहायला येत असेल तर पाण्यात जाण्याची भीती वाटत नाही. जो सराव करतो त्याला खात्री असते की तो मात करेल.

या ऑनलाईन कार्यक्रमासाठी डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबईचे नवनाथ वानवे यांची उपस्थिती लाभली तसेच सी.के.ठाकूर विद्यालय माध्यमिक विभागचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण आणि संकुलातील विविध विभाग प्रमुख तसेच षिक्षकगण उपस्थित होते.

## ओएनजीसी विद्यालयात विविध स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

परीक्षा पे चर्चा आणि नेताजी सुभाष चंद्र बोस यांची १२७वी जयंती केंद्रीय विद्यालय ओएनजीसी पनवेलमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती निमित्ताने शाळेमध्ये पराक्रम दिवस आयोजन करण्यात आले होते. पराक्रम दिवसाच्या निमित्ताने विद्यालयामध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या मध्ये नववी ते बारावीचे केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थी, जवाहर नवोदय विद्यालय, तसेच रायगड जिल्ह्यातील शासकीय व शासन मान्यता खासगी शाळांमधील सुमारे १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले.

या वेळी प्राथमिक विभागात पोस्टर मेकिंग, घोषवाक्य लेखन, भाषण अशा विविध स्पर्धा घेण्यात



आल्या. स्पर्धेसाठी परीक्षा योद्धांसाठीचे मंत्र, चांद्रयान, भारताचे खेळातील योगदान इत्यादी विषय देण्यात आले होते.

या स्पर्धांसाठी संजय सानपिपरे, अमित क्षीरसागर आणि सुजाता इंगोले यांनी परीक्षकाचे काम पाहिले. विजयी प्राचार्य विजय गर्ग यांचे हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनू बिनू कुमार यांनी केले. या कार्यक्रमासाठी ग. प्राची, भिमराव किर्तीराज या कलाशिक्षकांनी मेहनत घेतली.

**विजेते विद्यार्थी**

तांसी एस. भिडे (नववी, महात्मा इंटरनॅशनल स्कूल), तेजस्वी सिंह (नववी, केव्ही ओएनजीसी विद्यालय पनवेल), उर्वी सुवदन साफळे (नववी, बाल भारती पब्लिक स्कूल), श्रुतिका बेहरा (नववी, सेंट जोसेफ हायस्कूल), एंजल तेरेसा जोसेफ (नववी, बाल भारती पब्लिक स्कूल).



**वाशी : सिडको प्रदर्शन केंद्रात विश्व मराठी संमेलन २०२४चे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या शेवटच्या दिवशी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट दिली. मराठी भाषेच्या वैश्विक प्रचार, प्रसारासाठी जगभरातील मराठी भाषकांनी एकत्र येऊन एकाच व्यासपीठावर सर्वांगीण चर्चा करण्यासाठी मराठी तितुका मेळावावा हे विश्व मराठी संमेलन आयोजित केले गेले होते. २७ ते २९ जानेवारीदरम्यान झालेल्या संमेलनात चर्चासत्रे, कवितावाचन, कविसंमेलन, मराठी खाद्यसंस्कृतीसह विविध कार्यक्रम झाले.**



**कळंबोली : सेक्टर १९ येथे दिनेश सिरवी आणि राजेश सिरवी यांनी न्यू नॅशनल केमिस्ट दुकान सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, कळंबोली व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष कमल कोठारी, राजेश चौधरी, दिनेश चौधरी, महेंद्र चौधरी, सुरेश चौधरी, नेनाराम चौधरी, गुलाब चौधरी, अमरराम चौधरी, मोदारम चौधरी, पोखर चौधरी, धनराम चौधरी, कमल कोठारी, रामलाल चौधरी, कनाराम चौधरी, मुकेश चौधरी, तारा चौधरी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप प्रभाग क्र. १४ तर्फे प्रभागातील कुंभारवाडा परिसरात कै. अरविंद दत्तात्रेय पनवेलकर यांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या मोफत वृत्तपत्र वाचनालयाचे उद्घाटन रविवारी प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास बूथ अध्यक्ष राजेंद्र परदेशी, परेश शेटे, रितेश पवार, विश्वास कळवेकर, संदीप पनवेलकर, रूपेश तळोजकर, गणेश गव्हाणे, शंकर पनवेलकर, जयवंत पनवेलकर, शार्दुल अंब्रूते, पोपटशेठ गिरे, आकाश पनवेलकर, अनिकेत परदेशी आदी उपस्थित होते.**

## सेंट्रिंग प्लेटची चोरी करणाऱ्या आरोपींविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

कंपनीतील गाळ्याचे लॉक उघडून सेंट्रिंग प्लेटची चोरी करून पळून गेलेल्या चार अनोळखी व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुझमिल हुसेन खान हे सिव्हिल कॉण्ट्रॅक्टर असून ते हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन या कंपनीत संचालक म्हणून काम पाहतात. त्यांनी किरवली गावातील एका गाळ्यात लोखंडी सेंटिंग प्लेट, लोखंडी मुंडे, फ्रेम, लिफ्ट मशीन असे साहित्य ठेवले होते. कंपनीच्या गाळ्याशेजारील मालकाने फोन करून खान यांना त्यांच्या गाळ्यातील लोखंडी सेंट्रिंग प्लेट चार व्यक्ती रिक्षामध्ये भरून नेत असल्याचे सांगितले, मात्र खान घटनास्थळी येईपर्यंत हे चौघे सर्व माल रिक्षात भरून पळून गेले. जेव्हा खान त्यांच्या गाळ्याजवळ पोहचले तेव्हा चोरट्यांनी लोखंडी सेंट्रिंग प्लेट चोरून नेल्याचे त्यांच्या लक्षात आले. तसेच गाळ्यातील इतर साहित्य अस्ताव्यस्त पडलेले त्यांना दिसून आले.

दरम्यान, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गाळ्यातून लोखंडी मुंडे, केबलही चोरून नेल्याचे दिसून आले. खान यांनी पोलिसात तक्रार दिली असता पोलिसांनी तपास करून रिक्षा चोरीच्या मालासह तळोजा पोलीस ठाण्यात आणली.



**पनवेल : भाजप युवा नेते ॲड. पवन भोईर यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, दिनेश खानावकर, माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, सुनील पाटील, शशिकांत दिसले आदी उपस्थित होते.**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य जोत्स्ना ठाकूर यांची लाईफ मेंबरपदी निवड झाल्याबद्दल भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अनंता ठाकूर, अंकुश ठाकूर, जयवंत देशमुख, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, भार्गव ठाकूर, विश्वनाथ कोळी, सुधीर ठाकूर आदी उपस्थित होते.**

## भूगोल प्रज्ञाशोध परीक्षेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भूगोल प्रज्ञाशोध केंद्रामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय भूगोल प्रज्ञा शोध परीक्षेला बसण्याची संधी नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली. संस्थाचालक, मुख्याध्यापक, परीक्षा समन्वयक व पर्यवेक्षक यांनी परीक्षा होण्यासाठी योगदान दिले. सीकेटी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सुवर्ण, रौप्य व कांस्यपदके पटकावली आहेत.

स्पर्धेत पाचवी ते दहावीच्या एकूण २०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या गटात जिनल संजय वालावलकर हिने सुवर्णपदक, श्रावणी अमर थळे हिने रौप्य पदक व जान्हवी सुनील हिरे हिने कांस्यपदक प्राप्त केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनाही उत्कृष्ट नियोजनाबद्दल प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले तसेच भूगोल विषय शिक्षिका मनीषा नारखेडे यांना चषक देऊन गौरविण्यात आले.

या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. २९) वाणिज्य विभाग, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष व इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग अँड फायनान्स मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रामध्ये असणाऱ्या करिअरच्या संधी याविषयी सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग अँड फायनान्स संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रवी गुप्ता यांनी उपस्थित राहून महाविद्यालयात द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना बँकिंग क्षेत्रामध्ये असणाऱ्या करिअरच्या वेगवेगळ्या संधी व त्या दृष्टिकोनातून कशा पद्धतीने पूर्वतयारी करायची, परीक्षेमधील बारकावे याविषयी त्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वेगवेगळ्या बँकिंग परीक्षेची कशा पद्धतीने पूर्वतयारी तयारी करायची त्यासाठी जिद्द, चिकाटी, सातत्य याविषयी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या सुमारे १०० विद्यार्थी व विद्यार्थिनी या सत्रासाठी उपस्थित राहून लाभ घेतला.

या सत्राचे आयोजन प्रा. विशाल देशमुख वाणिज्य विभाग व प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष यांनी केले तसेच प्रा. नम्रता पारीक, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा.राहुल कांबळे, प्रा. मनोज यादव, प्रा. शिल्पा पाटील, प्रमोद वाघे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.





**पनवेल : रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष आणि पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक दिलीप पाटील, विकास घरत, भाजप नेते प्रदीप भगत, आदित्य भगत आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# चोराच्या उलट्या बोंबा

**दहाव्या परिशिष्ठाची अर्थात पक्षांतरबंदी कायद्याची चिकित्सा करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्षपदी राहुल नार्वेकर यांची नियुक्ती झाली आहे. शिवसेनाप्रश्नी त्यांनी जो अभ्यासपूर्ण निकाल दिला, त्याचा उपयोग भविष्यात अन्य राज्यांतील विधिमंडळातील तिढे सोडवण्यात केला जाऊ शकतो. तथापि, नार्वेकर यांच्या नियुक्तीमुळे ठाकरे गटाच्या नेत्यांचे मात्र धाबे दणाणले आहे असे दिसते.**

निवडणुकांची चाहूल लागताच देशभरातील राजकारणाचे रंग इतक्या भराभर बदलू लागले आहेत की विरोधकांना आपण नेमक्या कुठल्या दिशेने जावे हेच कळेनासे झाले आहे. सत्ताचक्रावर मजबूत पकड असलेला भारतीय जनता पक्ष आणि या पक्षाच्या विरोधात एकवटून ताकद लावण्याच्या प्रयत्नात तोंडघशी पडणारे विरोधक असे चित्र निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातदेखील विरोधी पक्षांची अवस्था शोचनीयच आहे. कुठल्याही परिस्थितीत भाजपला सत्तेवर येण्यापासून रोखायचे या एकमेव इराद्याने महाराष्ट्रातील विरोधी पक्ष इरेला पेटले आहेत. खरेतर या विरोधी पक्षांना 'पक्ष' म्हणणेदेखील जड जाईल अशी त्यांची अवस्था आहे. फुटाफुटीनंतर उरलेसुरले गट म्हणून त्यांची संभावना केली जाईल. ठाकरे गटाच्या विरोधात सगळेच निर्णय गेल्याने त्यांच्या हाती आता काहीच उरलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी लवादाचे काम पार पाडत अचूक निकाल दिला. त्यानुसार शिवसेना हा अधिकृत पक्ष मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली असल्याचे स्पष्ट झाले. धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह तर यापूर्वीच निवडणूक आयोगाने शिंदेप्रणित शिवसेनेला बहाल केले आहे. ठाकरे गटाचे कायदेशीर अस्तित्व नगण्य ठरवणाऱ्या या ऐतिहासिक निकालानंतर राहुल नार्वेकर यांची नियुक्ती घटनेच्या दहाव्या परिशिष्ठाची अर्थात पक्षांतरबंदी कायद्याची चिकित्सा करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्ष्यपदी जाहीर करण्यात आली आहे. ८४व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी आणि सचिव परिषदेमध्ये लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ही घोषणा केली. नार्वेकर यांनी दाखवलेली संविधानाची तसेच कायदेविषयक समज वाखाणण्याजोगी आहे. त्यांची गुणवत्ता पाहूनच लोकसभा अध्यक्षांनी त्यांची निवड केली असावी. तथापि, नार्वेकर यांच्या या नियुक्तीमुळे संविधान धोक्यात आल्याची हाकाटी नेहमीप्रमाणे पिटण्यात आली आहे. हे देशातील लोकशाही संपवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल मानायचे का, असा संतप्त सवालही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला आहे. नार्वेकर यांनी दिलेल्या निकालाच्या विरोधात ठाकरे गट सर्वोच्च न्यायालयात गेला असून तेथेच खरा निकाल लागेल अशी हवा निर्माण करण्याचा प्रयत्न सध्या सुरू आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात असताना ही नेमणूक करणे हा सर्वोच्च न्यायालयावर दडपण आणण्याचाच प्रकार आहे, असा आरोपदेखील ठाकरे यांनी केला. वास्तविक, या आरोपांच्या चिखलफेकीला काहीही अर्थ नाही, कारण विधिमंडळातील कामकाज आणि निर्णय न्यायालयाच्या कक्षेत फार मर्यादित स्वरूपात येतात. याच कारणास्तव महाराष्ट्रातील विधिमंडळातील तिढा विधानसभाध्यक्षांनीच सोडवावा असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. विशेष म्हणजे, नार्वेकर यांनी दिलेल्या निवाड्याबद्दल कुठलाही कायदेशीर आक्षेप ठाकरे गटाचे नेते नोंदवताना दिसत नाहीत. त्यांच्या निकालात काही त्रुटी असतील तर त्यावर टीका व्हायला हवी, पणु त्याऐवजी ऐकू येतात त्या चोराच्या उलट्या बोंबा! अशा प्रकारचे राजकारण फार काळ टिकाव धरत नाही याचा साक्षात्कार जनतेच्या न्यायालयात त्यांना होईलच. तोवर ही चिखलफेक निमूटपणे सहन करणे भाग आहे.

# रायगड रोप वेला सक्षम करण्याची गरज





**खबरबात**
**महेश शिंदे**

ऐतिहासिक किल्ले रायगडावर रोप वे झाल्यानंतर शिवभक्त आणि पर्यटकांची गर्दी दिवसेंदिवस वाढतच गेली आहे. यामुळे अनेक वेळा रायगडावर जाणाऱ्या पर्यटकांना गडावर जाताना मोठा मनस्ताप सहन करावा लागतो. याला पर्याय म्हणून नवीन शासकीय रोप वेची संकल्पना पुढे आली. हा रोप वे किल्ले रायगडाच्या पायथ्याशी म्हणजे टकमकटोकाच्या पायथ्याजवळ रायगडवाडी गावात होण्याकरिता आग्रह धरला जात होता.

ऐतिहासिक किल्ले रायगडावर अबालवृद्धांना जाता यावे याकरिता शासनाने १९९६ साली रायगड रोप वेची निर्मिती जोग इंजिनिअरिंग या कंपनीच्या सहाय्याने केली आहे. कोणतेही विदेशी तंत्रज्ञान न वापरता भारतीय तंत्रज्ञान व तंत्रज्ञांच्या सहाय्याने त्या काळात प्रतिकूल परिस्थितीत हा रोप वे बांधण्यात आला. सुरुवातीला स्थानिकांनी याला विरोध केला, पण स्थानिक तरुणांना नोकऱ्या व प्रचंड प्रमाणात वाढलेल्या रोजगारामुळे कालांतराने हा विरोध मावळला. हा रोप वे सुरुवातीची काही वर्ष कंपनीने आणि त्यानंतर शासनाने ताब्यात घ्यावयाचा असा करार झाला, पण रोप वे चालविण्याचे कोणतेच तंत्रज्ञान शासनाकडे नसल्याने आजमितीस श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली मिलेनियम कंपनी हा रोप वे चालवत आहे. यामुळे आजही हा रोप वे मिलेनिअम प्रॉपर्टी या खासगी कंपनीमार्फत चालवला जात आहे.

रायगडावर प्रतिवर्षी शिवभक्तांची संख्या वाढतच गेली आहे. सुट्टी आणि सहलीच्या काळात तर ही संख्या तीन ते चार हजारांमध्ये जाते. त्यातच गडावर शिवपुण्यतिथी, शिवराज्याभिषेक, शिवजयंती, आणि व्हीआयपींच्या आगमनावेळेस मोठी गर्दी उसळते. या वेळी अनेक मान्यवर, अधिकारी येत असल्याने त्यांना प्राधान्य दिले जाते. यामुळे सर्वसामान्य पर्यटक दिवसभर खोळंबून राहतो. गेली काही दिवस सलग सुट्ट्यांमुळे गडावर गर्दी उसळली आहे. यामुळे दुपारीच रोप वेची तिकीट विक्री बंद केली जाते, मात्र रायगड हा पुरातत्व विभागाकडे असल्याने पुरातन वास्तू जतन कायदा अनुषंगाने सायंकाळी ६नंतर गडावर प्रवेश नाही तसेच वास्तव्य करता येत नाही या कारणाने सायंकाळी ५ वाजता रोप वे बंद केला जातो. यामुळे अनेक पर्यटकांना गडावर जाण्याची संधी मिळत नाही. राज्याबाहेरून आलेल्या शिवप्रेमींनादेखील रायगड न पाहताच परत फिरण्याची वेळ येत आहे. हा मनस्ताप वाचवण्यासाठी शासनाने यात लक्ष घालून रोपे वेची क्षमता वाढवुन तो अधिक सक्षम करण्याची गरज आहे.

दरम्यान, रायगड प्रधिकरण निर्मिती शासनाने नवीन रोप वेची संकल्पना मांडली होती. सध्या सुरू असलेल्या रायगड संवर्धन प्रकल्पात या रोप वेचा समावेश करण्यात आला आहे. याकरिता सर्व्हेक्षण करण्यात आले असून टकमक टोकाच्या पायथ्याशी याकरिता मुबलक जागा उपलब्ध असली तरी त्यासाठी जागा संपादित करावी लागणार आहे तसेच हे अंतर जास्तीचे असून उंचीचे अंतर वाढणार आहे. टकमक टोक हे एक प्रेक्षणीय स्थळ असल्याने या ठिकाणी रोप वेचे अप्पर स्टेशन केल्यास टकमक टोकाचे महत्त्व संपुष्टात येणार आहे. या ठिकाणी नवीन रोप वेची मागणी केवळ छत्रपती खासदार संभाजीराजे व रायगडवाडी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत रायगड प्राधिकरणाच्या बैठकीत प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे भोसले यांना रायगड हितवर्धक समिती आणि रायगड परिसर विकास समितीकडून एक निवेदनदेखील देण्यात आले होते. वेळोवेळी झालेल्या बैठकीत नवीन रोप वेची मागणी करण्यात होती. सुरवातीच्या काळात याला खासदार संभाजीराजे यांनीदेखील चालना दिली होती, मात्र त्यानंतर मात्र याला पूर्णविराम दिला आहे. या उलट प्रशासनाने रायगड रोप वेला आणखी एक झुला जोडण्यास परवानगी दिली आहे. याच रोप वेची क्षमता वाढविल्यास या ठिकाणी काळ जलविद्युत प्रकल्प होत असल्याने पर्यटनाला वाव आहे. या परिसरातील वाड्या आणि गावाचा विकास होणार आहे.

रायगडवाडी गावातील दुर्लक्षित पुरातन वास्तू आहेत त्यांनादेखील जगासमोर आणणे गरजेच आहे. त्याचवेळी केवळ रायगड आणि रोप वेपुरते मर्यादित न राहता किल्ल्याच्या आजूबाजूचा परिसर विकसित करून प्रत्येक गावातील इतिहास उजेडात येणे गरजेचे आहे.

जर का शासनाने नवीन रोप वे किंवा आहे त्या रोप वेला सक्षम करून तिकीट दरात सवलत दिल्यास पर्यटकांचा ओघ वाढणार आहे व पर्यायाने परिसराचे पर्यटन वाढणार आहे. रायगड किल्ल्याच्या बांधणीत लागलेल्या साधनांचे कारखाने याच रायगडवाडी गावात होते. त्याचे अवशेषदेखील आजही या ठिकाणी कायम आहेत. शिवाय एक दुर्लक्षित शिवमंदिर, शिवकालातील वास्तू, विहिरी, पहावयास मिळतात. ज्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा शिवराज्याभिषेक केला त्या निश्चलपुरी गोसावी यांची समाधीदेखील या ठिकाणी आहे. यामुळे या दुर्लक्षित वास्तूदेखील उजेडात येणे गरजेचे आहे.

टकमकटोकाच्या पायथ्याशीच काळ जलविद्युत प्रकल्प होत आहे. यामुळे या प्रकल्पात साचणारे विस्तीर्ण पाणी आणि एकीकडे किल्ले रायगड असे सुंदर दृश्य पर्यटनाची नवी दिशा उखडणार आहे. रायगडवाडी गावात मुबलक पाण्याचीदेखील सुविधा आहे. शिवाय या गावाच्या जवळच काळ जलविद्युत प्रकल्पाचे पाणी साचणार आहे. या प्रकल्पासाठी लागणारी जागादेखील ग्रामस्थांनी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली होती. यामुळे या मागणीचा विचार शासनाने भविष्यातील पर्यटनाचा विकास पाहून करावी, अशी आशा येथील ग्रामस्थांना आहे.

रोप वेकडे जाणारा मार्ग हा अरुंद आहे. या ठिकाणी कायम वाहतूक कोंडी होत असते. रस्त्याचे रुंदीकरण होऊन पर्यटकांसाठी मुबलक पार्किंग व्यवस्था होणे गरजेच आहे. आज रोप वेच्या माध्यमातून लाखो अबालवृद्ध गडावर जाऊ शकले आहेत. शालेय विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात तिकीट आकारले जाते. तसेच अपंगांसाठी पूर्णपणे मोफत सेवा पुरविली जात आहे, तर ज्येष्ठ नागरिकांनादेखील सवलतीच्या दरात सेवा पुरविली जाते. येणाऱ्या पर्यटकांसाठी अचानक गर्दी झाली तर वेटींग रूमची व्यवस्था करण्यात आली असली तरी ती अपुरी आहे. तसेच शौचालय सुविधादेखील कमी पडत आहे. या काही मुलभूत सुविधा व व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे.

किल्ले रायगड हे संपूर्ण महाराष्ट्राचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे या परिसराचा व रोप वेचा विकास होताना गडाच्या मूलभूत ढाच्याला व सौंदर्याला बाधा येणार नाही याची दक्षता घेणेदेखील गरजेच आहे, पण येत्या काळात किल्ले रायगडाकडे पर्यटकांचा ओघ वाढणार असून नवीन अथवा आहे त्या रोप वेचे विस्तारीकरण होणे गरजेचे आहे हे आवर्जून नमूद करावेसे वाटते.



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲप युजर्ससाठी लाँच होणार खास फीचर

लॉकडाउनच्या काळात व्हिडीओ कॉलिंग ॲप्सचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ॲप गूगल मीट, झूम यांच्या मदतीने घरबसल्या काही कामे सोपी होऊ लागली. मोबाइलचा स्क्रीन शेअर करून प्रेझेंटेशन, व्हिडीओ कॉन्फरन्सिंग, मीटिंग, मुलाखत, विद्यार्थ्यांना शिकवणे आदी बऱ्याच गोष्टी या ॲप्सद्वारे शक्य होऊ लागल्या. आता गूगल मीट, झूमप्रमाणेच व्हॉट्सॲपसुद्धा त्यांच्या वापरकर्त्यांसाठी एक खास फीचर घेऊन येत आहे.



'मेटा'च्या मालकीच्या इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲपने २०२३मध्ये स्क्रीन शेअर फीचर लाँच केले होते, पण हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी उपलब्ध नव्हते. आता ॲण्ड्राॅइड आणि आयओएस, आयफोन वापरकर्ते या फीचरचा उपयोग करू शकणार आहेत. व्हॉट्सप व्हिडीओ कॉलमध्ये स्क्रीन शेअरिंग फीचर जोडत आहेत. या फीचरच्या माध्यमातून व्हिडीओ कॉलिंग करताना मोबाइलचा स्क्रीन शेअर करता येईल. या माध्यमातून एक युजर आपल्या मोबाईलमधील कन्टेन्ट दुसऱ्या युजर्सला दाखवू शकेल आणि काही अडचण असल्यास तिथे परस्पर संवाद साधू सांगू शकेल. स्क्रीन शेअर करताना ॲप्स स्विच करणेसुद्धा शक्य होईल.

**व्हॉट्सॲपवर स्क्रीन शेअरिंग फीचर कसे वापरावे?**

व्हॉट्सॲपवर व्हिडीओ कॉल सुरू करा. डिस्प्लेच्या तळाशी असलेल्या स्क्रीन शेअरिंग आयकॉनवर टॅप करा. तुम्हाला तुमची स्क्रीन शेअर करायची आहे याची खात्री करा. आता तुमच्या मोबाईलची स्क्रीन व्हिडीओ कॉलमध्ये उपस्थित सर्व वापरकर्त्यांना दिसेल. नंतर जर तुम्हाला स्क्रीन शेअर करणे थांबवायचे असल्यास स्टॉप शेअरिंग या पर्यायावर टॅप करा.

**व्हॉट्सॲप विंडोजवर स्क्रीन कशी शेअर करावी?**

व्हॉट्सॲप वापरकर्त्यांना डेस्कटॉपवरसुद्धा संपूर्ण स्क्रीन शेअर करण्याची परवानगी देते. डेस्कटॉप ॲपवर व्हिडीओ कॉल सुरू करा. स्क्रीनवरील शेअर आयकॉनवर क्लिक करा. स्क्रीन शेअरिंग हा पर्याय निवडा तसेच नंतर तुम्हाला स्क्रीन शेअरिंग थांबवायची असेल, तर तुम्ही थांबवू शकता. अशा सोप्या पद्धतीने तुम्ही लवकरच व्हॉट्सॲपवर स्क्रीन शेअरिंग हे फीचर वापरू शकणार आहात.

# गायक, व्हायोलिनवादक पं. गजाननबुवा जोशी



**निमित्त**

गायक, व्हायोलिनवादक व गुरू म्हणून सुविख्यात असणाऱ्या पं. गजाननराव अनंत जोशी यांचा जन्म मुंबईतील गिरगाव येथे ३० जानेवारी १९११ झाला. त्यांच्या आईचे नाव इंदिराबाई होते. त्यांचे घरगुती नाव 'राम' असे होते. पं. गजाननबुवांच्या घराण्यात संगीताची परंपरा होती. गजाननबुवांचे आजोबा मनोहरपंत हे सुमारे १८५०-१८७० या काळातील गायक होते. त्यांनी इचलकरंजीच्या रावजीबुवा गोगटे यांच्याकडे तालीम घेतली होती, तर वडील अनंत मनोहर जोशी तथा अंतूबुवा हे ग्वाल्हेर घराण्याचे उत्तम गायक म्हणून विख्यात होते.

वडील अंतूबुवा हेच गजाननबुवांचे पहिले गुरू होते. गिरगावात अंतूबुवांचे श्रीसमर्थ गायन वादन विद्यालय होते. त्यामुळे गजाननबुवांवर बालवयातच संगीताचे संस्कार झाले. अंतूबुवांच्या पत्नी व मुलांचे पाठोपाठ आकस्मिक निधन झाल्याने ते विद्यालय बंद करून प्रथम सांगलीस आले व नंतर त्यांची नेमणूक औंध संस्थानात दरबार गायक म्हणून झाली. वडिलांकडून गजाननबुवांना पारंपरिक पद्धतीने गायनाची तालीम मिळाली. शिवाय तबला, हार्मोनिअम ही वाद्येही सरावाची झाली. लहानपणी ते जलतरंग हे वाद्य अत्यंत तयारीने वाजवीत.

दहा वर्षांच्या छोट्या गजाननाचा जलतरंगवादनाचा पहिला कार्यक्रम औंधमध्ये भवानराव पंतप्रतिनिधींनी आयोजित केला व ते वादन संपूर्ण संस्थानामध्ये कौतुक व कुतूहलाचा विषय होता. औंधचे राजे पंतप्रतिनिधी यांनी स्वतःच्या कीर्तनाच्या साथीसाठी गजाननास हे वाद्य वाजवण्याची आज्ञा केली. वयाच्या तेराव्या-चौदाव्या वर्षी १९२३च्या आसपास गजाननाने व्हायोलिन हे वाद्य हाती घेतले व स्वतःच्या एकलव्य परिश्रमाने साध्य केले. गजाननबुवांनी रूढ अर्थाने कोणाकडेही व्हायोलिनवादनाचे शिक्षण घेतले नव्हते. त्या काळात हिंदुस्थानी संगीतात या वाद्याचा प्रसार विशेष झाला नव्हता व हे वाद्य अल्पपरिचित होते. या वाद्यावर उत्तर हिंदुस्थानी रागसंगीताचा आविष्कार करणाऱ्या कलाकारांच्या पहिल्या पिढीतील गजाननबुवा जोशी हे एक अग्रश्रेणीचे कलाकार म्हणून नावाजले गेले. त्यांचे १९२८पासून मुंबई रेडिओवर कार्यक्रम होऊ लागले. प्रभात फिल्म कंपनीच्या 'अयोध्येचा राजा' या पहिल्या बोलपटाच्या वाद्यवृंदात ते १९३०मध्ये सहभागी होते.

व्हायोलिनच्या स्वतंत्र मैफलींबरोबर पं. रविशंकर व उ. विलायत खाँ यांच्यासह केलेल्या जुगलबंदीच्या मैफलीही त्या काळी खूप गाजल्या. तत्कालीन महाराष्ट्रात व्हायोलिन म्हणजे पं. गजाननराव जोशी असे समीकरण सिद्ध करणाऱ्या बुवांनी वादनाची एक स्वतंत्र शैली निर्माण केली. या पाश्चात्त्य वाद्यावर भारतीय रागसंगीताच्या प्रस्तुतीचे तंत्र व ढाचा त्यांनी तयार केला. व्हायोलिनसाठी त्यांनी खास अशा अनेक गतींच्या रचनाही केल्या. 'भारताचा यहुदी मेनुइन' म्हणून गजाननबुवांचा गौरव करण्यात आला.

आवाजाची फारशी अनुकूलता नसतानादेखील लयकारी व रागदारीवर प्रभुत्व स्थापित करून अतिशय मेहनतीने त्यांनी आपले स्थान निर्माण केले. ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा या तीन घराण्यांचा रंग असणारा भारदस्त गायक अशी त्यांची ओळख होती व या गुणग्राही कलाकाराबद्दल सर्वत्र आदर होता.

गजाननरावांचा विवाह दुर्गाबाई यांच्याशी झाला (१९३३). त्यांना तीन मुले व तीन मुली. त्यांचे मनोहर, मधुकर हे पुत्र आणि कन्या सुचेता बिडकर (मालिनी जोशी) प्रसिद्ध गायक आहेत, ते व्हायोलीनवादनही करतात. धाकटे पुत्र नारायण तबला वादक. गजाननबुवांचे २८ जून १९८७ रोजी डोंबिवली येथे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**कर्जत : निसर्गरम्य वासराचा खोंड भागातील डोंगररांगा व परिसराचे टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# कोलेस्ट्रॉल, मधुमेह, बद्धकोष्ठतेवर पेरू उपयोगी

निरोगी आयुष्यासाठी हृदय निरोगी ठेवणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी तुमचे रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते. चुकीच्या जीवनशैलीचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो. खराब कोलेस्ट्रॉलमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यासह इतर अवयवांचेदेखील नुकसान होते.



हाय कोलेस्ट्रॉल आणि हाय ब्लड शुगर लेव्हलमुळे गंभीर समस्या उद्‌भवतात. त्याचप्रमाणे बद्धकोष्ठता हा त्रास बहुतेक सर्व वयोगटांतल्या लोकांना होताना दिसून येतो. मधुमेहदेखील अनेकांना असतो. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी, मधुमेह नियंत्रित करण्यासाठी व बद्धकोष्ठता दूर करण्यासाठी कोणते फळ तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते याविषयी फरिदाबादच्या एशियन हॉस्पिटलच्या प्रमुख आहारतज्ज्ञ कोमल मलिक यांनी माहिती दिली आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ...

आहारतज्ज्ञ सांगतात, सध्या थंडीचा हंगाम आहे. पेरूची मोठ्या प्रमाणात विक्री होत असते. पेरू हिवाळ्यातच नाही, तर प्रत्येक ऋतूत आवडीनं खाल्ला जातो. पेरू खाण्याचे अनेक फायदे आहेत. अशा परिस्थितीत कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यासाठी पेरूचे सेवन केले पाहिजे. पेरूमध्ये सॉल्युबल फायबरचे प्रमाण जास्त प्रमाणात असते, जे तुमच्या रक्तातील खराब कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी करते तसेच तुमच्या शरीरातील अतिरिक्त जमा झालेली चरबीदेखील नष्ट करण्यास मदत करते. पेरू खाल्ल्यामुळे तुमच्या हृदयाचे कार्यही सामान्य राहते. आपले चांगले कोलेस्ट्रॉल वाढण्यास आणि खराब कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळते.

तज्ज्ञांच्या मते, पेरू खाल्ल्याने मधुमेहावर नियंत्रण मिळवले जाऊ शकते. मधुमेह एक अशी समस्या आहे, ज्यात रक्तामध्ये साखरेचा स्तर नियंत्रित राहत नाही. ही समस्या शरीरात निर्माण होणाऱ्या इन्सुलिनला अडथळा निर्माण होण्याने उदभवते. पेरूमध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स म्हणजेच जीआय असतो, ज्यामुळे साखर नियंत्रित राहते. पेरूमध्ये भरपूर फायबर असते. ते रक्तातील साखरेच्या वाढीस प्रतिबंध करते.

पेरूमध्ये भरपूर फायबर असते, ज्यामुळे बद्धकोष्ठता दूर होऊन, पचन चांगले होते. त्यासोबतच पचनक्रियाही निरोगी राहते. पेरू थंड असतो. पोटाचे अनेक आजार दूर करण्यासाठी हा रामबाण उपाय आहे. पेरूमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी असते, जे अनेक रोगांना दूर ठेवण्यास फायदेशीर आहे.

## निवडक

### महामार्गावर ट्रक जळून खाक



**खालापूर :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील ढेकू गावाच्या हद्दीत मुंबई कडे जाणाऱ्या ट्रकच्या टायरला आग लागली व क्षणार्धात ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. आगीने संपूर्ण महामार्ग व ढेकू गावाच्या आसपास धुरांचे लोट निर्माण झाले होते. ही घटना दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास घडली.

### हिरवळ महाविद्यालयात मतदार दिन



**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) महाडमध्ये आजीवन अध्ययन विस्तार विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम आणि उपप्राचार्य राकेश वडवळकर यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व राष्ट्रीय सेवा योजना या विभागांमार्फत विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. यामध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा, निबंध स्पर्धा, पॅनेल चर्चा, परस्परसंवादी सत्रे आणि विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया आणि त्यांच्या सहभागाच्या परिणामाबद्दल शिक्षित करण्यासाठी पोस्टर सादरीकरण अश्या विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला.

### 'त्या' बालकाचे पालक सापडले



**खोपोली :** रविवारी सकाळी खंडाळा घाटातील वाघजाई मंदिराजवळ बालक नामे निखील अजय काळे (वय ४) हा झोपेत असताना रिक्षामधून पडलेला होता. रिक्षा पुढे निघून गेल्यानंतर पालकांना समजले की सोबतचा मुलगा पडला आहे, दरम्यान त्याचवेळी पाठीमागून येणारे ट्रक चालकास मुलगा रिक्षातून पडल्याचे दिसल्याने त्याने खोपोली पोलीस ठाणे येथे त्याला आणले. सोशल मीडियावर दिलेल्या माहितीनुसार हा मुलगा इंदिरानगर कळवा पूर्व ठाणे येथील असल्याचे समजले. त्यानंतर मुलाच्या वडिलांशी संपर्क साधून पोलीस ठाणे येथे बोलवून ताब्यात देण्यात आले.

# श्रीवर्धन शहरात वीकेन्डला वाहतूक कोंडी

## स्थानिकांना विनाकारण मनस्ताप ■ पोलीस बंदोबस्त वाढविण्याची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. शनिवार व रविवार असला की श्रीवर्धनमध्ये पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतात. पर्यटक आपली चारचाकी वाहने घेऊन शहरात आल्यानंतर जागोजागी पत्ता विचारण्यासाठी गाडी थांबवत असल्याने, अरुंद रस्ते असल्याकारणाने वाहतुकीची कोंडी होते.



वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळतात. त्यातच सध्या महाराष्ट्रातून शैक्षणिक सहली श्रीवर्धन समुद्रकिनारा पाहण्यासाठी येत असतात. या शैक्षणिक सहलीसाठी एका शाळेच्या चार चार पाच पाच बसेस एका रांगेने श्रीवर्धन शहरात घुसत असल्याने शहरामध्ये वाहतूक कोंडी अधिकच जटील होते.

पाच मिनिटांच्या प्रवासासाठी अर्धा ते पाऊण तास वाया घालवावा लागतो. श्रीवर्धन समुद्रकिनारी मठाच्या स्मशानभूमीजवळ उत्तरकार्य, दशक्रिया विधी करण्यासाठी जागा राखीव ठेवण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी अवधूताचे मंदिर आहे परंतु येणाऱ्या सहलींच्या बसेस त्याचप्रमाणे पर्यटकांची चार चाकी वाहने याच परिसरामध्ये उभी केलेली असतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीचे उत्तर कार्य किंवा दशक्रिया विधी शनिवार, रविवार या वेळेत आल्यास विधी कुठे पार पाडावा? याबाबत प्रश्नचिन्ह उभे राहते.

श्रीवर्धन नगर परिषदेला अनेकदा विनंती करूनसुद्धा नगर परिषदेकडून या ठिकाणी फलक लावण्यात येत नाही. ही जागा उत्तर कार्य व दशक्रिया विधीसाठी राखीव आहे. या ठिकाणी कोणीही वाहने पार्किंग करू नयेत किंवा या ठिकाणी अन्नपदार्थ शिजवू नयेत. अशा आशयाचा बोर्ड नगरपालिकेने लावणे अपेक्षित आहे, परंतु या बाबीकडे नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे पाहायला मिळते. श्रीवर्धन बाजारपेठेत तर वाहतूक कोंडी नेहमीच होत असते कारण अरुंद रस्ते व उभ्या केलेल्या वेड्यावाकड्या दुचाकी यामुळे वाहतूक कोंडीचे प्रमाण नेहमीच वाढत असते, मात्र जिल्हा वाहतूक शाखेकडून वाहतुकीचे नियमन करण्यासाठी केवळ एकच वाहतूक पोलीस तैनात करण्यात आलेला आहे.

किमान शनिवारी व रविवारी तरी जिल्हा वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षकांनी श्रीवर्धन येथे एक वाहतूक पोलीस ज्यादा नेमावा जेणेकरून वाहतूक कोंडी सोडवण्यास मदत होईल.

## भाजप सहकार आघाडी कोकण विभाग सहसंयोजकपदी गिरीष तुळपुळे

**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीष तुळपुळे यांची भारतीय जनता पक्षाच्या सहकार आघाडी कोकण विभाग सहसंयोजकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचा सामाजिक उपक्रम असलेल्या कमळ सेवा संस्था संचालित श्री. सतिश वासुदेव धारप डायलेसिस सेंटरचे शनिवारी (दि. २७) उद्घाटन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या समारंभात गिरीश तुळपुळे यांना भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहीचे नियुक्त पत्र देण्यात आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सेवा विभाग कोकण प्रांत प्रमुख विवेक भागवत, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप रायगड लोकसभा मतदारसंघ संयोजक सतिश धारप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ रायगड जिल्हा संघचालक रघुजी आंग्रे, दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष माजी आमदार धैर्यशिल पाटील, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणिस अ‍ॅड. महेश मोहिते, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर उर्फ छोटमशेठ, उत्तर रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष केदार साठे, महिला मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्षा हेमा मानकर, वैकुंठ पाटील, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील, कमळ सेवा संस्थेचे अध्यक्ष राजेश प्रधान आदी या वेळी उपस्थित होते.

## विश्वनाथ पाटील यांचा ११,१११ जोर बैठका मारण्याचा विक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड पोलीस दलातील निवृत्त पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ पाटील यांनी वयाच्या ६६व्या वर्षी ११ हजार १११ जोर बैठका मारण्याचा पराक्रम केला.



विश्वनाथ पाटील यांनी अलिबाग येथील रायगड पोलीस मुख्यालय पोलीस परेड मैदानावरील बापदेव सभागृहात पहाटे ४ वाजता जोर बैठका मारायला सुरुवात केली. सलग पाच तास १३ मिनिटांत त्यांनी या बैठका पूर्ण केल्या. यासह पाटील यांच्या नावावर आणखी एक वैयक्तिक विक्रम नोंदविला गेला आहे.

यापूर्वी विश्वनाथ पाटील यांनी वयाच्या ५०व्या वर्षी सहा हजार २१५ बैठका मारल्या होत्या. ५४व्या वर्षी तीन हजार २५३ सूर्यनमस्कार मारले होते, तर वयाच्या ६१व्या वर्षी ३० हजार ७२० दोरीउड्या मारण्याचा पराक्रम केला होता. याशिवाय सेवेतून निवृत्तीच्या दिवशी न थांबता ६४ किलोमीटर धावण्याचा पराक्रम केला होता.

अमृत महोत्सवी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विश्वनाथ पाटील यांनी सात हजार ७७५ जोर बैठका मारण्याचा संकल्प सोडला होता, पण त्यांनी याहून ११ हजार १११ जोर बैठका मारल्या.


**पेण नगरपरिषद, पेण**
**निविदा सूचना**
सन २०२३-२४

पेण नगरपरिषद, पेण जि. रायगड यांजकडून खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदार यांजकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अनु क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १. | नगरपरिषद कार्यालय, शाळा, शौचालय, मार्केट, उद्याने, स्मशानभूमी, वाचनालय, व्यायामशाळा व इतर न.पा मालमता दुरुस्ती करीता विद्युत साहित्य पुरविणे. | १०,००,०००/- | १०,०००/- | १,५००/- |
| २. | नगरपरिषद हद्दीतील पथदिवे दुरुस्ती करीता विद्युत साहित्य पुरविणे. | १०,००,०००/- | १०,०००/- | १,५००/- |
| ३. | पेण नगर परिषदहद्दीतील प्रभू आळी येथे हायमास्ट बसविणे. (फेर निविदा) | ५,३९,२३४/- | ५,०००/- | १,०००/- |
| ४. | नंदीमाळ नाका व कुंभार आळी तसेच म्हाडा वसाहत (प्रभाग क्र. १) मध्ये स्ट्रीट लाईट बसविणे. (फेर निविदा) | ४,०६,५०५/- | ४,०००/- | ५००/- |
| ५. | पेण नगर परिषद हद्दीतील रामवाडी येथे स्मारकाजवळ हायमास्ट लावणे. (फेर निविदा) | ५,५८,८४१/- | ५,०००/- | १,०००/- |

**कामाबाबत अटी व शर्ती :**
१. निविदा विक्रीचा कालावधी : २९/०१/२०२४ ते ५/०२/२०२४ पर्यंत पेण नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सकाळी १०.०० ते सायं. ५.३० वाजेपर्यंत.
२. सदरच्या सीलबंद निविदा कार्यालयीन वेळेत दिनांक ६/०२/२०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजे पर्यंत सादर करता येतील.
३. सदर कामाबाबत विस्तृत माहिती कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवसाखेरीज नगरपरिषद कार्यालयात विद्युत विभागात मिळेल.
दिनांक : २९/०१/२०२४
जा.क्र.: पेनप/विद्युत/

**सही/-**
**मुख्याधिकारी**
पेण नगरपरिषद, पेण



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शैती मिळकत त्या मिळकतसमोर लिहीलेल्या मालक/कब्जेदार कडुन आमचे अशिल **१) सौ प्रमिला संतोष पाटील २) संतोष दगडू पाटील, रा. उसाटणे, ता.जि. ठाणे.** हे विकत घेणार आहेत सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत, सदर शेत मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे महोदर, ता. पनवेल जि. रायगड.**

| मालक/कब्जेदाराचे नांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| १) श्री. लक्ष्मण चंदर दाढावकर<br>२) श्री. संजय चंदर दाढावकर<br>३) श्रीम. जनाबाई चांगदेव धोंगडे<br>४) श्रीम. मनुबाई नामदेव भोपी<br>५) श्रीम. शांताबाई आल्या भागवत<br>६) श्रीम. शांताबाई रामा घरत<br>७) श्रीम. हौसाबाई चंदर दाढावकर<br>८) श्रीम. बेबी अनंता दाढावकर<br>९) श्री. सोमनाथ अनंता दाढावकर<br>१०) श्री. राजेश अनंता दाढावकर<br>११) श्रीम. फशीबाई रामचंद्र दाढावकर<br>१२) श्री. रविंद्र रामचंद्र दाढावकर<br>१३) श्री. धनंजय रामचंद्र दाढावकर<br>१४) श्रीम. वैशाली काळूराम म्हात्रे | १६७<br><br>पैकी क्षेत्र | ००-३३-००<br>पो.ख. ०-०२-२०<br>**एकूण ०-३५-२०**<br><br>०-१७-५० | |

वर नमूद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुलहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**ठिकाण - पनवेल**
**दिनांक -२७/१/२०२४**

**सही/-**
**श्री. प्रफुल्ल विठोबा म्हात्रे**
अ‍ॅडव्होकेट हायकोर्ट व नोटरी (भारत सरकार)
११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर,
पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.


# कर्जत, खालापूर, नागोठण्यात मराठा समाजाचा जल्लोष



**कर्जत : प्रतिनिधी**

मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून साडेचार महिने आपल्या जीवाची बाजी लयुन आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला यश आल्यानंतर कर्जत तालुक्यात जल्लोष करण्यात आला. शहरात वाजत गाजत नाचत शहरातून मिरवणूक काढण्यात आली.

मराठा आरक्षणाचा लढा यशस्वी झाल्यानंतर आज सकाळी अकराच्या सुमारास शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारका जवळ सकल मराठा समाजाचे मनोहर थोरवे, राजेश लाड, मधुकर घारे, राम राणे, राजेश जाधव, प्रकाश पालकर, उदय पाटील, अनिल भोसले, पंकज पाटील, रत्नाकर बडेकर, बंडू तुरडे, हरेश घुडे, अभिषेक सुर्वे, अ‍ॅड. गोपाळ शेळके, दत्तात्रय पिंपरकर, अनिल मोरे, सोमनाथ पालकर, मधुरा चंदन, उज्वला हजारे, अ‍ॅड. पूजा सुर्वे, प्रमिला बोराडे, मारूती बैलमारे, केतन मोधळे, जयदीप शिंदे, केतन मुसळे आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मनोज जारांगे-पाटील यांच्या नावाने एकच जल्लोष करण्यात आला.

मिरवणूक बाजार पेठेतून, टिळक चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकापर्यंत जल्लोषात आली. आमदर महेंद्र थोरवे, राजिपचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे आदी या मिरवणुकीत सामील झाले. त्यानंतर डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून छोटेखानी सभेने मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

**चौक : प्रतिनिधी**

मराठा आरक्षण देण्याचा शासकिय निर्णयाची प्रत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या हातात दिल्यावर खालापूर तालुक्यात मराठा आरक्षण कार्यकर्ते यांनी एकच जल्लोष करुन आनंद साजरा केला. आपल्या मागण्यांसाठी मुंबईच्या वेशीपर्यंत आलेल्या मराठा समाज बांधवांना खालापूर तालुक्यातील मराठा बांधवांनी सहकार्य केले आहे. या वेळी तालुक्यातील हजारो मराठा बांधव उपस्थित होते.



**नागोठणे :** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश येऊन मराठा समाजाच्या मागण्या राज्य सरकारने मान्य केल्यामुळे मराठा समाजाच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी नागोठण्यात जल्लोष केला. या वेळी मराठा समाजामध्ये उत्साह दिसून आला.

मराठा आरक्षणाची मागण्या मान्य झाल्याचे नागोठण्यात समजताच मराठा समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जल्लोष साजरा केला.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर सूचना**

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग), पनवेल महानगरपलिका हद्दीत बसविण्यात आलेले २० ई-टॉयलेट कार्यान्वित करून पुढील ०३ वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता जाहीर सुचनेमध्ये नमूद केलेल्या बाबींकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. २९/०१/२०२४ ते दि. ०२/०२/२०२४ पर्यंत दुपारी ०५.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची बाजारभाव दरपत्रके दि. २९/०१/२०२४ ते दि. ०२/०२/२०२४ पर्यंत दुपारी ०५.०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

जा.क्र पमपा/घकवि/२५२४/प्र.क्र.०४/६८/२०२३
दि. २९/०१/२०२४

**सही/-**
**उप आयुक्त**
पनवेल महानगरपालिका



## पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **अनंत जनार्दन घरत व इतर** यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **अनंत जनार्दन घरत व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : हरिश्चंद्र पिंपळे (५५३३२६)**
**(ULPIN २१९४०७४७५९८), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७/२ | १ | ०.७८.५०<br>पो.ख. ०.०३.३० | ८.७५ |
| | | **एकुण ०.८१.८०** | |

**या एकुण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.२०.०० गुंठे**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २९ जानेवारी २०२४

**सही/-**
**अ‍ॅड. निलेश बा. झंजाड**
बी-१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड क्रमांक - ३३/३४,
सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल,
जिल्हा-रायगड -४१०२०६.मो. क्र. ९९२०४७५८०१

## निवडक

### सामूहिक मतदार प्रतिज्ञा ग्रहण



**नवी मुंबई :** भारत निवडणूक आयोग यांचेमार्फत प्राप्त निर्देशानुसार २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात राष्ट्रीय मतदार दिवसाची सामुहिक प्रतिज्ञा ग्रहण करण्यात आली. जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र असणाऱ्या भारत देशात मतदानाचे महत्त्व अधोरेखीत करणाऱ्या मतदार दिवसाचे औचित्य साधून नमुंमपा निवडणूक विभागाच्या वतीने महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृतीविषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

### भावेश पाटील सहसंपर्कप्रमुखपदी



**नवी मुंबई :** सानपाडा विभाग प्रमुखपदी असलेले भावेश पाटील यांची सानपाडा शिवसेनेच्या सहसंपर्कप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पाटील यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.शिवसेना उपनेते विजय नाहटा व जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी ही निवड केली. भावेश पाटील यांनी विभाग प्रमुख पदी असताना विविध सामाजिक समस्या सोडवण्यासाठी अग्रेसर भूमिका घेत अनेकांना न्याय मिळवून दिला. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना पक्षाने पदोन्नती दिली आहे.

### चिरनेर गावात प्रजासत्ताक दिन साजरा



**उरण :** भारताचा ७५वा प्रजासत्ताक दिन चिरनेर येथे वेगवेगळ्या शासकीय कार्यालयासह शाळा महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या वेळी कवायत, लेझीम, देशभक्तीपर गीते, देशभक्तीपर वकृत्व आणि सांस्कृतिक, सामाजिक उपक्रम झाले. चिरनेर ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी, हुतात्मा स्मारक, सोरला तलाव, छत्रपती शिवाजी चौक, हुतात्मा स्मृती स्तंभ, चिरनेर पोलीस चौकी, पोस्ट कार्यालय, केळाचा माळ आदिवासी वाडी या ठिकाणी ध्वजारोहणाचे कार्यक्रम झाले.

# नवी मुंबईत रस्ता सुरक्षा अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२४ च्या अनुषंगाने रविवारी (दि. २८) सकाळी ११ ते १२ वाजे दरम्यान नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत वाहतूक विभाग तुर्भे व शिव वाहतूक सेवा नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले.

या वेळी आयोजक दिलीप आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेवा नवी मुंबई, पोलीस निरीक्षक महाजन तुर्भे वाहतूक विभाग तसेच पोलीस नाईक गोडे, तेलंगे, चौधरी यांनी नेरूळ रेल्वे स्टेशन सन्मान हॉटेल समोर हुतात्मा बाबू गेनू रिक्षा स्टॅन्ड या ठिकाणी रिक्षा चालक मालकांची मीटिंग घेतली. मीटिंगमध्ये रिक्षा चालकांना वाहतुक नियमनाबाबत प्रबोधन करण्यात आले. तसेच प्रामाणिक रिक्षा चालक राम बाबू सिंग याने त्याचे रिक्षातून प्रवास करणाऱ्या एका महिला प्रवासीचे ७० हजार रुपये असलेली पर्स नेरूळ पोलीस स्टेशन येथे जमा करून सदर महिलेला परत देऊन उत्कृष्ट काम केले होते. त्याबद्दल त्यांना सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी कार्यक्रमास रिक्षा चालक-मालक संघटना, शिव वाहतूक सेवा नवी मुंबई अध्यक्ष दिलीप आमले साहेब आपला माणूस स्टँड प्रमुख नंदू जाधव, सचिन लाड शधनंजय विश्वासराव, सुनील गाडे, नवनाथ कातकर, संजय दांडगे, सुदाम पोखरकर, प्रणय तुडीलकर सुनील पाटील रामा पाटील इत्यादी पदाधिकारी व सुमारे १०० पेक्षा जास्त रिक्षा चालक उपस्थित होते.

## उरण पूर्व भागात चोरांचा सुळसुळाट

**उरण : वार्ताहर**

उरण पूर्व विभागात गेल्या अनेक दिवसांपासून चोरीचे प्रकार मोठ्या प्रमाणात चालू आहेत गेले अनेक दिवस चोरट्यांनी घरफोडी करून नागरिकांना हैराण केले आहेत चिरनेर, कळंबूसरे, कोप्रोली, पाले अशा विविध गावांत चोरांनी आपली दशहत माजवली आहे या चोरट्यां मुळे गावा गावांत भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावात दररोज व्यवसाय करणारे फुल हार वाळे, दूध खारी बटर वाळे यांना व्यवसाय करणे जिर्ण झाले आहे. गेली अनेक दिवस फूल हार वाळे दूध खारी बटर वाळे गावा गावांत व्यवसायासाठी येत नसल्याने नागरिकांना या गोष्टी पासून वंचित राहवे लागत आहे. चोरांच्या बंदोबस्तासाठी गावा गावातील नागरिक पहारा करत असुन पोलिसांकडून योग्य ते सहकार्य मिळत नसल्याने नागरिकांना मोठा संभ्रम निर्माण होत आहे तरी नागरिकांनी स्वतःचे रक्षण करावे, असे नागरिकांकडून बोलले जाते.

## बाजार समितीत भाज्यांचे दर वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आरक्षणासाठी मोठ्या संख्येने आलेल्या मराठा आंदोलकांमुळे एपीएमसीचे व्यवहार ठप्प होते. या आंदोलनाचा परिणाम वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीवर जाणवत असून भाज्यांचे दर वाढलेले आहेत.



या काळात राज्य तसेच परराज्यांतील भाजी, धान्य आणि फळांचे ट्रक बाजारात येऊ शकले नाहीत. त्यामुळे आवक कमी असल्याने भाज्यांचे दर वाढले आहेत. घाऊक बाजारात कांद्याचे दर २७ रुपये किलो असून किरकोळ बाजारात ३१ ते ३४ रुपये प्रतिकिलोने कांदा विकला जात आहे. तसेच टोमॅटोचे दर घाऊक बाजारात २४ रुपये असून किरकोळ बाजारात टोमॅटो २८ ते ३० रुपये आहेत. फ्लॉवर किरकोळ बाजारात २८ ते ३० रुपये प्रतिकिलो असून फरसबी ६७-७४ रुपयांना विकली जात आहे.

> *मालाची आवक सोमवारपर्यंत सुरळीत होईल. त्यानंतर बाजारात भाव कमी होतील. तोपर्यंत ग्राहकांनी धीर धरावा.*
> **-देवीलाल गुप्ता,** *व्यापारी, कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई*

# राज ठाकरे म्हणतात, हिंदी राष्ट्रभाषा नव्हे!

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंदी ही राष्ट्रभाषा नाही. ही भाषा उत्तम असली तरीही. हिंदी चित्रपटांमधून आमच्या अंगावर हिंदी आली, पण बोलताना मराठी लोक हिंदी का वापरतात? असा प्रश्न उपस्थित करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी भाषेबाबत आपले स्पष्ट मत व्यक्त केले आहे. नवी मुंबई येथे २८ जानेवारीपासून तीन दिवसीय विश्व मराठी संमेलनाला सुरुवात झाली आहे. या संमेलनाचे आमंत्रण मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उपस्थित राहत आपले मनोगत व्यक्त केले.



ते म्हणाले की, राज ठाकरे येतील, तुमच्याशी बोलतील, अनेक विषय सुचवतील, मराठीला कसे पुढे न्यायचे हे सांगतील. पण मी आज तुमच्यासमोर उभा आहे कारण गेली अनेक वर्ष मी मराठी विषयावर बोलत आहे. मराठी भाषेसाठी अंगावर केस घेतल्या आहेत, मराठी विषयासाठीच मी जेलमध्ये गेलो होतो. मी आताही तेच सांगत आहे की, मी अत्यंत कडवट मराठी आहे. माझ्यावर संस्कारही त्याचप्रकारचे झाले आहेत. आजोबांचे पुस्तकरुपात झाले. बाळासाहेबांचे, माझ्या वडिलांचे झाले आणि महाराष्ट्रातील अनेक लोकांचे झाले आणि महाराष्ट्र ही काय ताकद आहे, हे जसंजसे समजत गेले, तसतसा मी आणखी त्याच्या प्रेमात पडत गेलो. जूनमध्ये मला अमेरिकेतील मराठी मंडळाने आमंत्रण दिले. याचे अध्यक्ष मला भेटले त्यांनी मला सांगितले की, आम्ही अमेरिकेत १०० मराठी शाळा काढल्या आहेत. महाराष्ट्रातल्या मराठी शाळा बंद होत असताना, अमेरिकेत मराठी शाळा सुरु होतात, हे काही कमी आहे का?

परदेशात मराठी शाळा सुरू होत असल्या तरी मला असे वाटते की, महाराष्ट्रात लक्ष देणे गरजेचे आहे. जगभरात मराठी माणूस पसरलेला आहे. इतर देशांमध्ये गेलेला आहे, त्याबद्दल अभिनंदन. जेवढा महाराष्ट्राचा विचार इतर लोकांमध्ये, देशांमध्ये नेता येईल आणि आपण किती श्रीमंत आहोत, हे सांगता येईल ते उत्तमच. महाराष्ट्रात, महाराष्ट्रातील शहरांमध्ये आज मराठी सोडून ज्यावेळी हिंदी कानावर येऊ लागते, त्यावेळी मला त्रास होऊ लागतो. भाषेला विरोध नाही, भाषा उत्तम. पण हिंदी ही आमची राष्ट्रभाषा नव्हे, जशी मराठी, तमिळ, तेलगु, गुजराती भाषा आहेत, तशीच हिंदीसुद्धा भाषा आहे, असेही राज ठाकरे यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## विंधणे आदिवासीवाडी शाळेत स्नेहसंमेलन



**उरण : बातमीदार**

अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून उरण तालुक्यातील विंधणे आदिवासीवाडी शाळेत स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या स्नेहसंमेलनात आदिवासी कला नृत्य संस्कृतीचे दर्शन करणारी वेशभूषा व नृत्य अविष्कार शाळकरी मुलांनी सादर केले.'आदिवासी वादळ' या नृत्याविष्काराने रसिकांना आदिवासी संस्कृतीचा ठेवाच पहायला मिळाला. शाळकरी मुलांनी विविध अंगी ३८ नृत्याविष्कार गीते सादर करून रसिकजनांचे मनोरंजन देखील केले.

स्नेहसंमेलनात शालेय अंतर्गत झालेल्या विविध स्पर्धामध्ये विजयी ठरलेल्या मुलांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरणदेखील करण्यात आले. या वेळेस उरण कोमसाप (कोकण मराठी साहित्य परिषद) शाखेचे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी आदिवासी संस्कृतीचे जतन करणाऱ्या शाळकरी मुलांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात उपस्थित पालक व विद्यार्थी वर्गाला राजेश चोगले यांनी व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास नामदेव ठाकूर, सुमन कातकरी, दीपक कातकरी, रमेश पाटील, भरत पाटील, गोकुळदास कातकरी, रवींद्र कातकरी, महेश कातकरी, मुख्याध्यापक संदीप पाटील आदी उपस्थित होते.

## मागण्या मान्य झाल्याने मराठा समाजाचा जल्लोष

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी शासनासमोर ठेवलेल्या मागण्या मान्य केल्यानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने पनवेल शहरासह कळंबोली, कामोठे, खांदेश्वर, करंजाडे व खारघर या ठिकाणी शनिवारी आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कळंबोली येथे पोलीस निवारा चौकात, तसेच इतर विविध ठिकाणी सकल मराठा समाजातर्फे ढोल-ताशांच्या गजरात जल्लोष करण्यात आला.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन केले होते. त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शासनाने मराठा समाजाला आरक्षण दिले नाही तर उपोषण करण्याच्या मागणीवर मनोज जरांगे-पाटील ठाम होते. शासनाच्या शिष्टमंडळाकडून त्यांना आंदोलन करू नये, यासाठी विनंती करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरांगे पाटील यांना मराठा समाजाच्या मागण्या मान्य केल्या संदर्भाचे पत्र दिल्यानंतर राज्यात एकच जल्लोष सुरू झाला. पनवेलमध्ये सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने ठिकठिकाणी मिठाई वाटून फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आलेल्या आनंदोत्सवात मराठा समाजातील अबालवृद्ध व महिला उत्स्फूर्त सहभागी झाल्या होत्या.

## वासांबेमध्ये हळदीकुंकू समारंभ



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील वासांबे आई महिला बचत गटाकडून ग्रामसंघाच्या महिलांकरिता हळदीकुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात सरपंच उमात मुंढे, वर्षा पाटील, ग्रामपंचायत सदस्या प्रतिक्षा राऊत, सिआरपी उज्वला शेंडकर यांच्यासह परिसरातील बचत गटांच्या महिला हळदीकुंकू समारंभात उपस्थित होत्या. यावेळी वासांबे आईं महिला बचत गटाच्या महिलांनी पारंपारिक गाण्यांवर ताल धरला.

वासांबे आई महिला बचत गटाच्या अध्यक्षा तथा ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे यांनी उपस्थित मान्यवर महिलांचे पुष्पगुच्छ देवून बचत गटाच्या वतीने आभार मानले. कार्यकृरम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा रसिका खराडे,उपाध्यक्ष सुष्मिता अहिर, सचिव रेखा पवार, खजिनदार रुपाली अहिर, रंजना पाटील,नाजुका खराडे, सुप्रिया अहिर, दिपिका अहिर,वंदना जोडे, नम्रता खेत्री, मंजुला खराडे आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईत रंगला पारंपरिक, वेस्टर्न संस्कृतीचा फॅशन-शो

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव



-२०२४ पारंपरिक आणि वेस्टर्न संस्कृतीचा अगळा वेगळा फॅशनेबल कपडे, वेशभूषा या प्रसिद्ध व्यक्ती या ठिकाणी एखाद्या विशिष्ट कल्पनेवर वेशभूषा करून रॅम्पवॉक केलेल्या फॅशन शोमध्ये चक्क अंध मुली व मुले रॅम्पवॉक वर चालल्या. यांचा आत्माविश्वासपूर्ण रॅम्प वॉक हा अनेकांना प्रेरणा देणारा ठरला आहे. यामध्ये अनेक संस्कृतीचा फॅशन शो करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात २५ कलाकारांनी सहभाग घेतला होता. भव्य संध्याकाळ आनंद आणि आरामाच्या क्षणांनी भरलेली होती ज्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. ग्लॅमर, टॅलेंट आणि मनोरंजनाच्या वाटचालीत स्पर्धकांनी त्यांचे कौशल्य दाखविल्यामुळे त्यांनी भावनांचा एक रोलरकोस्टरदेखील पाहिला. या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्यासमवेत अश्मिक कामठे, आरती भास्कर, मंदार तांडेल, व अश्मिक फॅशन ग्रुप, कलाकार व असंख्य नागरिक उपस्थित होते.

## शंकर महादेवन यांच्या गाण्यांचा कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने आ. मंदाताई म्हात्रे यांच्या पुढाकाराने सीबीडी येथील सुनील गावस्कर मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सवा मध्ये सुप्रसिद्ध गायक पद्मश्री शंकर महादेवन यांनी आपल्या सुमधुर आवाजाने नवी मुंबईकरांना मंत्रमुग्ध केले.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्था व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सव-२०२४ चे आयोजन मोठ्या उत्साहाने करण्यात आले. श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या वतीने गेली २७ वर्षे समाजपयोगी, शैक्षणिक, व सांस्कृतिक कार्यक्रम, नाटय, संगीत व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच दरवर्षी प्रमाणे संगीत दिग्दर्शक व सुप्रसिद्ध गायक पद्मश्री शंकर महादेवन यांनी कार्यक्रमाप्रसंगी उपस्थिती दर्शवली होती. तसेच त्यांची गाणी ऐकण्याकरिता हजारोच्या संख्येने संगीत प्रेमी जनसमुदाय सीबीडी येथील सुनील गावस्कर मैदानामध्ये उसळला होता. शंकर महादेवन यांनी कार्यक्रमाप्रसंगी गायलेले सुनो गोर से दुनिया वालो, भारत का बच्चा बच्चा, जय श्री राम बोलेगा आणि शिव तांडव या गाण्यावर आमदार मंदा म्हात्रे समवेत संपूर्ण नवी मुंबईकरांनी ठेका धरला.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक दीपक पवार, माजी नगरसेवक अशोक गुरखे, माजी नगरसेवक डॉ. जयाजी नाथ, माजी नगरसेवक निलेश म्हात्रे, डॉ. राजेश पाटील, बलबीर चौधरी, पंजाब वेलफेयर कल्चरल असो अध्यक्ष कमल शर्मा, विकास सोरटे, पांडुरंग आमले, सुहासिनी नायडू, जयश्री चित्रे, तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक, महिला व कलाकार उपस्थित होते.

## एक दिवस कवितेसाठी कविसंमेलन उत्साहात



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

जाई फाउंडेशन संचालित शब्दवेल साहित्य मंचद्वारा आयोजित एक दिवस कवितेसाठी हे कविसंमेलन के. गो. लिमये वाचनालय पनवेल येथे मोठ्या उत्साहात झाले.

या वेळी या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणुन शब्दवेलच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षा कवयित्री योगिनी वैदू, प्रमुख पाहुणे म्हणुन प्रा. प्रतिभा सराफ (ज्येष्ठ साहित्यिका), शिवाजी गावडे (ज्येष्ठ साहित्यिक) उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शब्दवेलचे अध्यक्ष प्रवीण बोपुलकर यांनी केले. काव्यसंमेलनास परीक्षक म्हणुन गझलकार कमलाकर राऊत, स्वाती गावडे व कविता राऊत यांनी काम पाहिले. एकुण ३५ कवीमधून कवी रामबंधु खंडू अंढागळे, चेंबुर यांना प्रथम, कवयित्री अक्षदा गोसावी, नेरूळ यांना द्वितीय तर कवी विशाल पवार पनवेल हे तृतीय तर बालकवी समर नितीन मोतलिंग यांस उत्तेजनार्थ पुरस्काराने गौरविण्यात आले.

सूत्रसंचालन शब्दवेलचे केंद्रीय संघटन प्रमुख देवेंद्र इंगळकर व आभार शब्दवेलचे रायगड जिल्हाध्यक्ष विलास पुंडले यांनी मानले.

# आगामी निवडणुकांमध्ये यश मिळवू

## भाजप नेते आमदार प्रवीण दरेकर यांचा विश्वास

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आगामी निवडणूक काळात सुपर वॉरियर्सना सोबत घेऊन सर्व निवडणुकांमध्ये आपण प्रचंड यश मिळवू, असा विश्वास भाजपचे विधान परिषदेतील गटनेते तथा रायगड लोकसभा क्षेत्राचे प्रभारी आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केला आहे. ते सुपर वॉरियर्सच्या बैठकीत बोलत होते.

महाड विधानसभा मतदारसंघातील सुपर वॉरियर्सची बैठक आमदार प्रवीण दरेकर यांच्या उपस्थितीत नुकतीच झाली. या बैठकीस भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, महाड विधानसभा प्रमुख बिपीन म्हामुणकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार प्रवीण दरेकर भाषणात म्हणाले की, २२ जानेवारीला अयोध्येत प्रभू श्रीरामाचे मंदिर उभे राहिले आणि ५०० वर्षांचा वनवास संपला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते राम मंदिर लोकार्पण व मूर्ती प्रतिष्ठापना झाली. झाले. राजकीय जीवनात मी २५-३० वर्षे काम करतोय, परंतु एवढ्या वर्षाच्या काळात राममय झालेले वातावरण यापूर्वी कधीही पाहिले नाही.





पक्ष वाढवायला वेगवेगळ्या गोष्टी लागतात. त्यामध्ये वातावरण हा महत्त्वाचा भाग असतो. आज आपण सर्व बाजूंनी वरचढ आहोत. आपल्याकडे जगात लोकप्रिय असणारा नेता आहे ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. कुठल्याही पक्षाकडे एवढा लोकाभिमुख नेता नाही. आपला पक्ष देशातीलच नव्हे तर जगातील सर्वांत मोठा पक्ष आहे. तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांची झोकून काम करणारी फळी ही खरी पक्षाची संपत्ती आहे. प्रत्येक कार्यकर्ता वैचारिक अधिष्ठानावर उभा राहिलेला आहे, असे आमदार प्रवीण दरेकर यांनी नमूद केले.

या सरकारच्या माध्यमातून जेवढा विकास करता येईल तेवढा करणार आहोत. हे सर्व करीत असताना संघटन हा महत्त्वाचा भाग आहे. जे काही भविष्य घडवायचे आहे ते या वॉरियर्स आणि प्रमुख लोकांच्या हातात आहे. आपल्याला वॉरियर्स का केले, आपली जबाबदार काय? हे समजून घेऊन बूथवर आपले वर्चस्व कसे प्रस्थापित करता येईल याची काळजी घ्यावी. ज्या गावात विकासकामे करायची आहेत ती कामे आपण करू. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वावर ज्यांचा विश्वास आहे त्या सर्वांना आपल्या प्रवाहात घ्या, लाभार्थ्यांशी संवाद साधा, असे आवाहनही आमदार दरेकर यांनी या वेळी केले.

माझे बारीक लक्ष महाड-पोलादपूरच्या सर्व विकासकामांकडे असणार आहे. सभागृहात मी महाड-पोलादपूरचे पाच-सहा विषय मांडले नाहीत असे एकही अधिवेशन गेले नाही. नुसते प्रश्न मांडले नाही, तर त्या प्रश्नांची सोडवणूकही मी केली. २०० खाटांचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल राज्य सरकारकडून मंजूर करून घेतले. पोलादपूर तालुक्यात आपण तालुका क्रीडा भवन उभे करतोय. येणाऱ्या काळात विकासासंदर्भात महाड, पोलादपूर, माणगावमध्ये मी स्वत: जातीने लक्ष देणार असल्याचे आमदार दरेकरांनी सांगितले.

### उद्धव ठाकरेंवर डागली तोफ

या वेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा समाचार घेतला. ते म्हणाले, उद्धव ठाकरेंवर बोलण्यासारखे काही नाही. त्यांनी सर्व हातातून घालवले आहे. नाशिकच्या मेळाव्यात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली. ते एवढे भ्रमिष्ट झालेत की टीका आणि शिव्या देण्याशिवाय दुसरे कामच करीत नाहीत. अडीच वर्षांच्या कालावधीत तुमचे सरकार असताना तुम्ही काही केले नाही. याउलट पंतप्रधान मोदींनी विविध घटकांसाठी योजना, उपक्रम, निर्णय घेत विकास व प्रगती साधली आहे. दरम्यान, त्यांनी युवा वॉरिअर्सला जोमाने काम करण्याचे आवाहन केले.

# गावच्या विकासासाठी कटिबद्ध -वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून देशात विकास सुरू आहे. हर घर जल या योजनेतून प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी जलजीवन मिशन योजनेतून ४२ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आमदार रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून ही विकासकामे होत आहेत. हनुमानपाडा गावात कोट्यवधी रुपयांचा विकास निधी उपलब्ध करून कामे झाली आहेत. भविष्यामध्ये तरुणांची, महिलावर्गाची तसेच ज्येष्ठांची जी कामे असतील त्याची मागणी करावी. गावाच्या विकासासाठी सकारात्मक कामे करण्यास कटिबद्ध आहे, अशी ग्वाही भाजपचे दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी केले. ते हनुमानपाडा येथे अंतर्गत रस्ता कामाच्या शुभारंभ कार्यक्रमात बोलत होते.

आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप युवा नेते वैकुंठ पाटील यांच्या माध्यमातून हनुमानपाडा गावात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करण्यात येत आहेत. या कामांचे भूमिपूजन युवा नेते वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास रूपेश पाटील, उपसरपंच गणेश घरत, ग्रामपंचायत सदस्य गोपीनाथ मोकल, भरत पाटील, भाजप विभाग अध्यक्ष, भाग्यश्री पाटील, शंकर मोकल, तुळशीदास पाटील, कविता पाटील, नयन पाटील, रत्नाकर घरत, मधुकर पाटील नरेंद्र पाटील, नितीन मोकल, सूरज पाटील, प्रमोद पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी दिवाचा टेपाचा रस्ता (७.५० लाख), स्मशानभूमी साकव (चार लाख), मंदिराजवळ गटार (नऊ लाख), शाळा दुरुस्ती (तीन लाख), स्मशानभूमी ते मंदिर रस्ता (पाच लाख), शाळेसमोरील रस्ता (नऊ लाख), मंदिराजवळील अंतर्गत रस्ता (पाच लाख) ही कामे झाली असून गटाराचे प्रस्तावित काम (चार लाख) आहे, तर भाजपच्या माध्यमातून जलजीवन योजनेंतर्गत ४२ लाख व इतर १० लाख निधीतून कामे झाली असल्याचे सांगण्यात आले.



# संकष्ट चतुर्थीनिमित्त महड, पालीत गणेशभक्तांची मांदियाळी





**चौक, पाली : प्रतिनिधी**

नव्या वर्षातील पहिली संकष्ट चतुर्थी सोमवारी (दि.२९) असल्याने अष्टविनायक तिर्थक्षेत्रांपैकी महड आणि पाली येथे गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

विशेष म्हणजे शुक्रवार, शनिवार व रविवारी लागून सार्वजनिक सुटी होती. या तीन दिवसांत अनेक भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. मागील तीन दिवसांच्या सुट्टीनंतर कार्यालयीन दिवस होता. तरीही सोमवारी महड व पाली येथे भाविकांची गर्दी दिसून आली.

भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिक यांचा धंदा तेजीत होता. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. येथील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तूंची दुकाने, नारळ, हार, फुले, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. मंदिर परिसरात मोठी वर्दळ होती. भाविकांच्या सोयीसाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने व्यवस्था करण्यात आली होती.

# जांभूळपाड्याची कन्या निलम पवारचे सौंदर्य स्पर्धेत यश




**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील वऱ्हाड जांभूळपाडा येथील निलम श्याम पवार हिने वाशी येथील मेसमेरिक मिस इंडिया पेगिएन्ट २०२४ या स्पर्धेत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत निलमने १८ ते ३० कुमारी वयोगटात उत्कृष्ट सादरीकरण करीत फस्ट रनर अपचा किताब जिंकला.

निलम पवारचे शिक्षण पाली येथील ग.बा. वडेर हायस्कूल तसेच शेठ ज.नौ. पालीवाला महाविद्यालयात झाले असून अंगभूत कलाकौशल्य, जिद्ध, चिकाटी, महत्त्वाकांक्षा, परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर तिने सौंदर्य स्पर्धेत नावलौकिक मिळवला आहे. महिला सुरक्षेवर काम करण्याचा मानस निलमने व्यक्त केला आहे.

उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतात व्यक्त होत विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक, नवोदित स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या. दरम्यान, निलमचे परिसरात अभिनंदन होत आहे.

# भावना दुखवल्या जातील असे कृत्य करू नका!

## मुरूड पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**मुरूड : प्रतिनिधी**

सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकून कोणाच्या भावना दुखावल्या जातील अगर भांडण होईल असे कृत्य नागरिकांनी टाळावे. समाजात शांतता व एकोपा राहील असे वागावे. व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्विटर आदी सामाजमाध्यमांचा जपून व काळजीपूर्वक वापर करा, असे आवाहन मुरूड पोलीस ठाण्याच्या निरीक्षक निशा जाधव यांनी केले आहे.

पोलीस निरीक्षक जाधव पुढे म्हणाल्या की, मुरूड पोलीस ठाणे हद्दीतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही कोणत्याही धर्म, जात, पंथ याबाबत आक्षेपार्ह पोस्ट, स्टिकर, अथवा मजकूर सोशल मीडियावर पोस्ट करू नये, अथवा स्टेटसवर ठेवू नये. रायगड जिल्हा पोलीस दलाची सायबर सेल व मुरूड पोलीस सर्व पोस्टवर लक्ष ठेवून आहेत. अशा पोस्ट करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. याशिवाय कोणीही कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा काही चुकीचे निदर्शनास आल्यास त्यावर तत्काळ विश्वास न ठेवता मुरूड पोलीस ठाणे अथवा आपले ओळखीचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांच्याशी तत्काळ संपर्क साधावा. रायगड जिल्हा पोलीस दल सदैव आपल्यासोबत आहे.

# भाजप नेते अण्णा कंधारेंकडून शालेय विद्यार्थ्यांना डबे वाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य अण्णा कंधारे सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असतात. त्यांनी हिंदू एज्युकेशन संचलित ओंकार विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांना न्याहारी आणण्यासाठी डब्यांचे वाटप केले.

सुमारे दोनशे शालेय विद्यार्थ्यांना याचा लाभझाला. कंधारे यांनी खाऊचेसुद्धा वाटप केले. या वेळी उपस्थित शिक्षकवृंद व व्यवस्थापन कमिटी यांनी कंधारे यांचे विशेष ऋण व्यक्त केले.



# रोह्यात आयुष्मान विमा कार्ड उपक्रम



**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य वैभव कुलकर्णी यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला.

भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा दक्षिण रायगड सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रोह्यातील प्रेरणा गतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप, मेहंदळे हायस्कूल ग्रंथालयात पुस्तके, तर तालुक्यातील घरेलू कामगार महिलांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत पाच लाखांचा विमा कार्ड देण्यात आले. या कार्यक्रमास कार्यकर्त्या रिया कासार, अनिल घरजाळे, दिनेश पंदेरे, अमेय पाडगे, निनाद चव्हाण, कमलेश चांदोलकर, हाजी कोठारी, कामगार संघटना जिल्हा अध्यक्ष अशोक निकम, विनीत गावंडे, परेश चितलकर, सिद्धांत मोरे आदी उपस्थित होते.

# मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

रोटरी क्लब आणि कर्जत परिसर ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञानयज्ञ सोहळा समितीच्या वतीने आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, दादर-मुंबईतील ज्योविस आयुर्वेद, नारी सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने कर्जतमध्ये मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ४२१ रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली.




या शिबिराचे आयोजन कर्जतमधील पोलीस मैदानावर करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटलच्या डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते झाले. उद्घाटन समारंभास रोटरी क्लबचे अध्यक्ष जितेंद्र ओसवाल, डॉ. ज्योती सातपुते, आमदार स्व. तुकाराम सुर्वे प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, माधव भडसावळे, सतीश श्रीखंडे, डॉ. प्रेमचंद जैन, सुनील सोहनी, संतोष वैद्य, शिवाजी भासे, अमोल देशमुख, वसंत ठाकूर, साजन ओसवाल आदी उपस्थित होते.

जितेंद्र ओसवाल यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. या शिबिरात डॉ. राज सातपुते, डॉ. मणिशंकर गुप्ता, डॉ. अश्विनी राठोड, डॉ. अदिती गायकवाड यांच्यासह पंधरा डॉक्टर आणि दहा आरोग्यसेवकांनी आरोग्यसेवा दिली. त्यांनी पित्त, पाठदुखी, वात, रक्त मोक्षण, आमवात, अग्निकर्म, लकवा आजाराचे रुग्ण यांची चिकित्सा केली. बहिरेपणा, सांधेदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी आदी व्याधींवर उपचार केले तसेच रुग्णांची तपासणी आणि चिकित्सा करण्यात आली, तर रुग्णांच्या चामखीळ आणि भोवऱ्या डॉ. ज्योती सातपुते, डॉ. सलोनी लंकेश्वर, सोनल राईकवर यांनी तत्काळ काढल्या. एकूण ४२१ रुग्णांची तपासणी करून सर्व रुग्णांना मुंबई येथील नारी सामाजिक संघटनेच्या माध्यमातून औषधे मोफत देण्यात आली.

या शिबिरास दीपचंद जैन, विशाल शहा, नितीन आहिर, सूर्याजी ठाणगे, अभिषेक सुर्वे, दत्तात्रय म्हसे, अनिल पाटील, आयेशा वाडकर, महेश क्षीरसागर, किरण पाटील, सोमनाथ ठोंबरे, ज्योती पाटील, शलाका मुसळे-गरूड, वसुधा ठाकूर आदी उपस्थित होते.

# संदीप पोमन यांना सेवानिरोप

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, सहाय्यक निरीक्षक संदीप पोमन यांची गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग येथे बदली झाली असून त्यांच्या जागी सहाय्यक निरीक्षक हरेश काळसेकर रूजू झालेले आहेत. नागोठणे पोलिसांच्या वतीने रविवारी सायंकाळी पोमन यांच्या निरोप समारंभाचे आयोजन केले होते. त्या वेळी नागोठणेकरांनी त्यांना प्रेम भावनेने निरोप दिला.

या वेळी पोमन यांचा नागोठणेकरांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला तसेच खोपोली येथून बदली होऊन नागोठणे पोलीस ठाण्याचा नव्याने कारभार हाती घेतलेले सहाय्यक निरीक्षक हरेश काळसेकर यांचे नागोठणेकरांनी स्वागत केले.

# भंडारी समाजातर्फे मान्यवरांचा सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील भंडारी समाजामधील सामाजिक, राजकीय, पत्रकारिता, रांगोळी व सिनेसृष्टीतील नऊ कलाकारांचा कै.राजाराम लक्ष्मण खोत मुरूड तालुका भंडारी बोर्डिंगतर्फे एका कार्यक्रमात हृद्य सत्कार करण्यात आला.

भंडारी बोर्डिंगच्या सभागृहात झालेल्या या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी बोर्डिंगचे अध्यक्ष श्रीकांत सुर्वे होते. समारंभास खजिनदार अशोक पाटील, काळभैरव पतसंस्थेचे अध्यक्ष दीपक पालशेतकर, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, निशिकांत खोत, राजेंद्र पुलेकर, भालचंद्र घुमकर, विलास खोत, अॅड. पाटील, कासेकर, शैलेश खोत व अन्य संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.



या वेळी आगरदांडा सरपंच आशिष हेदुलकर, नांदगाव सरपंच सेजल सुदेश घुमकर, ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र हेदुलकर, रूपाली चिंदरकर, माधवी खोत, हेमंत नाईक, पत्रकार उदय खोत, रांगोळीकार अनिरूद्ध खेडेकर, सिने अभिनेता शैलेंद्र पालशेतकर आदींना विविध मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

### किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

# पिंपरी चिंचवड, जालना संघ अजिंक्य

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे फुलगाव येथील नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या प्रांगणात खासदार स्व. गिरीश बापट यांच्या स्मरणार्थ आयोजित ३४व्या किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत किशोर गटात पिंपरी चिंचवड संघाने, तर किशोरी गटात जालना संघाने फिरता चषक पटकावत अजिंक्यपदावर आपले नाव कोरले.



महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएसनच्या मान्यतेने व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने झालेल्या या स्पर्धेत किशोर गटामध्ये पिंपरी चिंचवड संघाने नंदुरबार संघावर ५३-२९ असा सहज विजय मिळविला. मध्यंतराला पिंपरी चिंचवड संघाकडे २४-१२ अशी आघाडी होती. त्यांच्या गढाळे व सोपान पुणेकर यांनी जोरदार खेळ करीत सामन्याच्या पहिल्या चढाईपासूनच सामन्यावरील पकड ढिली होऊ दिली नाही. त्यामुळे नंदुरबारचा बचाव खिळखिळा झाला व ते आक्रमणदेखील फारसे प्रभाव दाखवू शकले नाही. पिंपरी चिंचवडच्या सुवराज रेडकरने उत्कृष्ट पकडी घेतल्या. नंदुरबारच्या कृष्णा साठे व आकाश मटकर यांनी काहीसा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला होता, पण त्यांना आपला प्रभाव टाकता आला नाही. सुशांत शिंदे यांने काही चांगल्या पकडी केल्या. नंदुरबारच्या खेळाडूंनी ११ बोनस गुण मिळविले.

किशोरी गटात जालना संघाने नाशिक शहर संघावर ३७-३५ असा निसटता विजय मिळविला. मध्यंतराला जालना संघाकडे १७-१४ अशी आघाडी होती. सामन्याच्या सुरुवातीपासूनच हा सामना अत्यंत चुरशीचा झाला. मध्यंतरानंतर दोन्ही संघांनी जोरदार खेळ करीत प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. जालन्याच्या मोनिका पवार व भाग्यश्री गायकवाड यांनी अत्यंत चपळाने खेळत आपल्या संघाला पहिल्यापासूनच आत्मविश्वास देत विजय साकारला. त्यांना राणी भुजंग हिने काही उत्कृष्ट पकडी करीत चांगली साथ दिली. नाशिक शहरच्या बिदिशा सोनार व अस्मिता चव्हाण यांनी जोरदार प्रतिकार करीत सामना जिंकण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. कामिनी जाधव हिने सुरेख पकडी केल्या, मात्र त्यांना विजेतपदाने हुलकावणी दिली.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण बापट यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी स्पर्धा आयोजक माजी आमदार व लोकसेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक पायगुडे, व्याख्याते कबीर महाराज, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे, उपाध्यक्ष शकुंतला खटावकर, सहकार्यवाह रवींद्र देसाई, पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्तात्रय कळमकर, सरकार्यवाह दत्तात्रय झिंजुर्डे, माजी कार्याध्यक्ष वासंती बोर्डे, राज्य संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## नमो चषक कबड्डी स्पर्धेत सीकेटी कॉलेज, कर्नाळा स्पोर्ट्स विजेते

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नमो चषक २०२४ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या भव्य कबड्डी स्पर्धेचा थरार कामोठेमध्ये कबड्डीरसिकांना अनुभवायला मिळाला. पुरुष गटात सीकेटी कॉलेजने, तर महिला गटात कर्नाळा स्पोर्ट्सने विजेतपद पटकाविले.




देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय भरारी आणि देशाच्या झालेल्या विकासाबद्दल आदरभावना व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष कार्यकारिणीने दिलेल्या निर्देशानुसार भारतीय युवा मोर्चाच्या संयोजनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात नमो चषक स्पर्धा होत आहेत. त्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल विधानसभा क्षेत्रात भव्य क्रीडा, कला आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्या अनुषंगाने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूल येथे नमो चषक भव्य कबड्डी स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेतील पुरुष खुल्या गटात सीकेटी कॉलेजच्या संघाने विजेतेपद पटकावले. ब्रुडर स्पोर्ट्स कळंबोली संघ उपविजेता ठरला. तृतीय क्रमांक संकल्प पनवेलने व संघर्ष पनवेल संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. महिला खुल्या गटात कर्नाळा स्पोर्ट्स पनवेल संघ विजेता, महात्मा फुले कॉलेज पनवेल उपविजेते, तर तृतीय व चतुर्थ क्रमांक अनुक्रमे कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल व ब्रुडर स्पोर्ट्स कळंबोली संघांनी मिळविला. या सर्व विजेत्यांना १० फेब्रुवारीला होणाऱ्या बक्षीस वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## क्रिकेट स्पर्धेत पोयनाड महसूल विभागाला विजेतेपद

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पोयनाड व्यापारी असोसिएशन, पोयनाड विद्युत महावितरण प्राधिकरण, पोयनाड महसूल विभाग आणि झुंझार वॉरियर्स क्रिकेट संघ सहभागी झाले होते. यामध्ये पोयनाड महसूल विभागाने विजेतेपद पटकाविले.



प्रथम साखळी व नंतर बाद फेरीनुसार स्पर्धा झाली. अंतिम सामना पोयनाड महसूल विभाग विरुद्ध झुंझार वॉरियर्स संघांमध्ये झाला. त्यामध्ये महसूल विभागाने झुंझार वॉरियर्स संघाचा पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली. विद्युत महावितरण प्राधिकरण संघाने तृतीय, तर व्यापारी असोसिएशन संघाला चतुर्थ क्रमांकावर समाधान मानावे लागले.

संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करणारा महसूल विभागाचा कल्पेश नाईक याला मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज महसूल विभागाचा रोशन पाटील, उत्कृष्ट गोलंदाज महावितरण संघाचा सागर वालेकर, तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून झुंझार वॉरियर्स संघाचा महेंद्र पालव यांची निवड करण्यात आली.

बक्षीस वितरण सभारंभास 'झुंझार'चे अध्यक्ष अन्वर बुराण, सचिव किशोर तावडे, ग्रामपंचायत सदस्य किशोर जैन, अजित चवरकर, खजिनदार दीपक साळवी, भारतीय सैन्य दलाचे सैनिक उदय चवरकर, व्यापारी असोसिएशनचे सदस्य भरत जैन, 'झुंझार'चे सदस्य अजय टेमकर, मंडळ अधिकारी महेश निकम, महावितरणचे शिवाजीराव ठोंबे, पंकज चवरकर, सुजित साळवी, शैलेंद्र गायकवाड, राजेंद्र जाधव, निहाल चवरकर, ॲड.पंकज पंडित, बंटी टेमकर, अविनाश सावंत यांच्यासह पोयनाड विभागातील क्रीडारसिक व खेळाडू उपस्थित होते. या वेळी विजेते संघ व वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

### सब ज्युनिअर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेत

## आयुष गरूड, तनया पाटील विजेते

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्युट दादर-मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्युट दादर येथे आयोजित केलेल्या ५७व्या सब ज्युनिअर राज्य अजिंक्यपद कॅरम स्पर्धेच्या १४ वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत पुण्याच्या आयुष गरुडने मुंबईच्या रुद्र गवारेवर २१-१०, २१-५ अशी सहज मात करून या गटाचे विजेतपद पटकाविले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत मुंबई उपनगरच्या वेदांत राणेने रत्नागिरीच्या द्रोण हजारेवर १०-१४, १४-९, व १७-४ असा निसटता विजय मिळविला.




१४ वर्षांखालील मुलींच्या एकेरी अंतिम सामन्यात पुण्याच्या तनया पाटीलने रत्नागिरीच्या स्वरा मोहिरेवर १९-५, २१-० असा सहज विजय मिळवून गटाचे विजेतपद पटकाविले. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात सिंधुदुर्गच्या पूर्वा केतकरने रत्नागिरीच्या स्वरा कदमवर ११-५, १०-८ अशा विजयाची नोंद केली.

१२ वर्षांखालील कॅडेट मुले एकेरी या गटात अंतिम सामन्यात ठाण्याच्या नील म्हात्रेने बाजी मारली. त्याने ठाण्याच्याच अनंत जैनला १५-११, १५-८ असे अंतिम फेरीत नमविले. या गटात तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीत कोल्हापूरच्या ओंकार वडारने मुंबईच्या प्रताप केदारवर २१-७, २१-० असा सहज विजय नोंदविला.

१२ वर्षांखालील कॅडेट मुलींच्या गटात अंतिम फेरीत जळगावच्या ज्ञानेश्वरी धोंगडे रत्नागिरीच्या निधी सप्रेला १४-१०, २-२१ व १७-९ अशा तीन सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत पराभूत करून विजय मिळविला. या गटात तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या लढतीमध्ये सिंधुदुर्गच्या दिव्या राणेने मुंबईच्या सुसान बासीमल्लावर १७-५, ०-१८ व १७-१३ असा विजय मिळविला.

विजेत्या खेळाडूंना विश्व कॅरममधील विजेते संदीप दिवे, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष यतिन ठाकूर, खजिनदार केतन चिखले, सचिव अरुण केदार व आंतर राष्ट्रीय पंच अजित सावंत यांच्या हस्ते चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## जामनेरमध्ये 'नमो कुस्ती महाकुंभ'; भारतातील सर्वांत मोठी स्पर्धा रंगणार

**जळगाव : प्रतिनिधी**

आपल्या लाल मातीतला रांगडा खेळ आणि खेळाडूंना स्फूर्ती देणारी कुस्ती आता देशाच्या नव्या पिढीला निर्व्यसनी करण्यासाठी कुस्ती दंगल करणार आहेत. कुस्तीच्या माध्यमातून निर्व्यसनी पिढीचा संदेश खेळाडूंपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन यांच्या पुढाकाराने जळगाव जिल्ह्याच्या जामनेर येथे 'नमो कुस्ती महाकुंभ' नाद कुस्तीचा, प्रण व्यसनमुक्तीचा या देशातील सर्वांत मोठ्या कुस्ती दंगलचे आयोजन येत्या ११ फेब्रुवारीला केले जाणार आहे.

या अभूतपूर्व स्पर्धेत महाराष्ट्रासह दिल्ली, हरयाणा, पंजाब, जम्मू काश्मीर, कर्नाटक येथील पैलवान आपला दम दाखवतील. विशेष आकर्षण म्हणजे विश्वविजेता, अर्जुन पुरस्कार विजेता, हिंदकेसरी, रुस्तम-ए-हिंद, महान भारत केसरी, महाराष्ट्र केसरी व उपमहाराष्ट्र केसरी हे सारेच दिग्गज पैलवान सहभागी होणार आहेत. एकाच मंचावर इतके दिग्गज खेळाडू खेळण्याची बहुधा ही पहिलीच वेळ आहे. त्यामुळे या दंगलच्या निमित्ताने जामनेरमध्ये कुस्तीप्रेमींना एक अद्भुत दंगल अनुभवायला मिळणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने हा महाकुंभ आम्ही घेतोय. श्रीरामाच्या कृपेने तरुण पिढी व्यसनमुक्त व सशक्त व्हावी हा या कुस्ती दंगलमागचा उद्देश आहे, असे आयोजक मंत्री महाजन म्हणाले.

## राष्ट्रीय कुमार-कुमारी कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

हैदराबाद येथे होणाऱ्या ४९व्या राष्ट्रीय कुमार-कुमारी गट कबड्डी स्पर्धे करिता महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने आपला १२ जणांचा चमू जाहीर केला आहे. याशिका पुजारी हिच्याकडे किशोरी, तर रजत सिंग याच्याकडे कुमार गटाचे नेतृत्व सोपविण्यात आले. हे दोन्ही खेळाडू मुंबई उपनगर संघाचे सदस्य आहेत.



रजत सिंग



याशिका पुजारी

१ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत हैदराबाद येथील कसानी कृष्णा मुदियाल आणि जे. एस. गेहलोत अकॅडमीच्या मैदानावर राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे सामने होतील. महाराष्ट्राच्या निवडण्यात आलेल्या संघाचा ठाणे येथील येऊर येथे जोरदार सराव शिबिर प्रशांतदादा फाऊंडेशन व विठ्ठल क्रीडा मंडळ यांच्या सौजन्याने घेण्यात आले. हा संघ दिनांक ३० जानेवारी रोजी ठाणे येथून देवगिरी एक्सप्रेसने स्पर्धेकरिता हैदाबादला रवाना होईल.

कुमारी गट संघ : याशिका पुजारी (संघनायिका, मुंबई उपनगर), समृद्धी मोहिते, नयना झा, हरजित कौर संधू (मुंबई उपनगर), झुवेरिया पिंजारी, वैभवी जाधव (पुणे ग्रामीण), भूमिका गोरे, अर्चना सरेले (पिंपरी-चिंचवड), ऋतुजा अवघडी, अनिशा निकम (कोल्हापूर), निकिता लंगोटे (परभणी), ऋतुजा आंबी (सांगली); प्रशिक्षक : मालोजी भोसले, व्यवस्थापिका : चंद्रिका केळकर-जोशी.

कुमार गट संघ : रजत सिंग (संघनायक, मुंबई उपनगर), ओम कुडाळे (मुंबई उपनगर), जयेश महाजन, वरुण खंडाळे (नंदुरबार), अनुज गावडे (पुणे ग्रामीण), अतुल जाधव (परभणी), साहिल पाटील, वैभव खाडे (कोल्हापूर), सिद्धार्थ सौतोने, विक्रम परमार (पिंपरी-चिंचवड), यश निंबाळकर (पालघर), अभिराज पवार (सांगली); प्रशिक्षक : शंतनू पांडव, व्यवस्थापक : समीर खेडेकर, मुख्य व्यवस्थापक : सुरेश तरे.

## इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीसाठी सरफराज, वॉशिंग्टन सुंदरला संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या हैदराबाद कसोटीत भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. सामन्याच्या एका दिवसानंतर संघाला सलग अनेक धक्के बसले. प्रथम जसप्रीत बुमराहला आयसीसीने फटकारले आणि शिक्षा सुनावली. त्यानंतर टीम इंडियाचे दोन स्टार खेळाडू रवींद्र जडेजा आणि केएल राहुलही दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडले.

विशेष म्हणजे पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी विराट कोहली आधीच संघाबाहेर आहे. केएल राहुलच्या जागी सरफराज खानला संघात संधी मिळाली आहे. त्याचबरोबर रवींद्र जडेजाच्या जागी वॉशिंग्टन सुंदरला संघात स्थान मिळाले आहे.

याशिवाय आवेश खानही रणजी संघात राहणार असून त्याच्या जागी सौरभ कुमारची निवड करण्यात आली आहे.

जीवेत् शरदः शतम्!

**संदेश कोळी**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
रमेश कोळी

भावपूर्ण श्रध्दांजली

कष्टातूनी केली आयुष्याची सुरूवात ।
सर्वांवर फिरवला मायेचा हात ।।
जवळ येताच काळाने फिरवली पाठ। जन्मो
जन्मी पाहू आम्ही चातकाप्रमाणे वाट आई...।।



कै.श्रीमती जिजाबाई गोपळशेठ नाईक

यांचे शुक्रवार, दि २६ जानेवारी २०२४ रोजी अकस्मित दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या आत्मसास चिरशांती लाभो हि ईश्वर चरणी पार्थना.

* दशक्रिया विधी *
रविवार दि.०४/०२/२०२४ रोजी
श्री क्षेत्र नशिक येथे दशक्रिया विधी होणार आहे.

* उत्तरकार्य विधी *
बुधवार दि.०७/०२/२०२४ रोजी
राहत्या घरी बामणडोंगरी येथे होणार आहे.

| | | |
|---|---|---|
| मंगळवार ३० जानेवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | श्रीपती बाबा भजन मंडळ, ज्ञानेश्वर बुवा गव्हाण, पखवाज- गौरव म्हात्रे व मंडळी. |
| बुधवार ३१ जानेवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | भैरवनाथ प्रासादिक भजन, बुवा -सुरेश भोईर (कर्जत), पखवाज -ज्ञानेश्वर खैर. |
| गुरूवार ०१ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | श्री विष्णूलक्ष्मी प्रासादिक महिला भजन मंडळ (दापोली), कुमारी स्नेहल पाटील, पखवाज -सुनिल पाटील, चालक -बळीराम |
| शुक्रवार ०२ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | दत्तप्रसाद भजन मंडळ (गव्हाण), बुवा -देवानंद कोळी व मंडळी |
| शनिवार ०३ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | हनूमान प्रासादिक भजन मंडळ (पडघे), बुवा -संगीतरत्न शंकूबुवा पडघेकर , पखवाज -किशोर पाटील, चालक -पांडूशेठ |
| रविवार ०४ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | दत्ताप्रसाद भजन मंडळ (कोपर), बुवा -नितीन ठाकूर व रशिक कानडा, पखवाज -गौरव म्हात्रे आणि तुकाराम कोळी. |
| सोमवार ०५ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | कृष्णा बुवा पवार गावदेवी प्रासादिक वांवजे भजन मंडळ, पखवाज -विशाल पाटील |
| मंगळवार ०६ फेब्रुवारी २०२४ | सायं ६ते८ वा. | पंडित निवृत्ती बुवा चौधरी नादब्रम्ह साधन मंडळ रांजणपाडा, पखवाज - निलेश पाटील |

०७ फेब्रुवारी २०२४ रायगड भूषण ह.भ.प. रामदास महाराज पाटील शिक्षण अध्ध्यात्मिक संस्था महड, पक्कवाज-विशाल पाटील वांवजे आणि मंडळी



शोकाकुल : समस्त नाईक परिवार बामणडोंगरी व व असेष्ठ

टिप:- कृपया कोणत्याही प्रकारचे दुखवटे आणू नये.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com